02 Nov 2026_Layout 1 11/2/2026 12:33 AM Page 1

नोव्हेंबर/November
सोमवार/Monday
दि.०२/Dt: 02
२०२६/2026

महाराष्ट्रातील दैनिक
जगमित्र
सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6
किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com
● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740
www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक १४/Issue 14 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

गरिबांचे धान्य पळवणारा तो 'अदृश्य बकासुर' कोण?

कागदोपत्री २०० चा परवाना, मग उरलेल्या १४९ दुकानांचे धान्य कोणाच्या घशात?

हप्तेखोर अधिकारी जोमात, बीडचे प्रशासन कोमात: जनतेचा रस्त्यावर उतरण्याचा इशारा!

छोट्यांकडून २ हजार, मोठ्यांकडून ५ हजार; पुरवठा विभागाच्या पंटरांचा वसुलीचा सपाटा!



माहिती अधिकाराला केराची टोपली; बीड तहसीलदारांकडून महाघोटाळ्यावर पांघरूण?



संगनमताने कोट्यवधींचा डल्ला: संपूर्ण यंत्रणेवरच संशयाची सुई..

तहसीलदार, जिल्हा पुरवठा अधिकारी, पुरवठा निरीक्षक, गोदामपाल (गोदाम कीपर) आणि खाजगी मध्यस्थ अशा सर्वांचे लागेबांधे असल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर शासकीय धान्याची अफरातफर शक्यच नाही, असा थेट आरोप नागरिक करत आहेत. गरिबांच्या हक्काचे गहू-तांदूळ गोदामातून निघून नेमके कोठे गायब होते, याची संपूर्ण साखळीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.



गोरगरिबांचा घास पळवणारा बकासुर उघडा पाडा; १४९ बोगस दुकानांच्या धान्याची उच्चस्तरीय चौकशी करा!



उच्चस्तरीय चौकशीची मागणी; जनतेचा संयम सुटण्याआधी कारवाई होणार का?

रद्द आणि निलंबित केलेल्या दुकानांच्या नावावर सरकारी धान्याची चोरी करणारा तो अदृश्य 'बकासुर' कोण? प्रशासन त्याच्यावर कारवाई करणार की त्याच्या हप्त्यांवर मेहरबान राहून डोळेझाक करणार? असा थेट सवाल आता बीड तालुक्यातील कार्डधारक विचारत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ तपास यंत्रणेमार्फत उच्चस्तरीय चौकशी करून तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

माहिती अधिकाराचा गळा घोटला; भ्रष्टाचारावर पडदा टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न...

या संपूर्ण काळ्या कारभाराविरोधात सजग नागरिकांनी माहिती अधिकारात माहिती मागवली असता, प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी माहिती अधिकाराचा कायदा सर्रास फाट्यावर मारत आहेत. माहिती दिल्यास भ्रष्टाचार चव्हाट्यावर येईल आणि थेट तुरुंगाची हवा खावी लागेल, या भीतीने जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. बीड तहसीलदारांच्या अखत्यारीत सुरू असलेला हा प्रकार म्हणजे संविधानाने दिलेल्या अधिकारांची पायमल्ली असल्याची टीका होत आहे.

बीड/जगमित्र न्यूज

गोरगरिबांच्या तोंडचा घास पळवून स्वत:ची घरे भरणारा पुरवठा विभागातील महाभ्रष्ट 'बकासुर' सध्या बीड तालुक्यात उघड माथ्याने थैमान घालत आहे. तालुक्यात कागदोपत्री अस्तित्वात नसलेल्या, परवाने रद्द झालेल्या आणि निलंबित केलेल्या तब्बल १४९ रेशन दुकानांच्या नावावर दरमहा लाखोंचा रेशन धान्य उचलून थेट काळ्या बाजारात विकले जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. हा महाघोटाळा उघडकीस येण्याच्या भीतीने बीड तहसील कार्यालयाने चक्क माहिती अधिकार कायदाच गुंडाळून ठेवला असून, लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम सुरू असल्याचा संतप्त आरोप सामान्य नागरिकांमधून केला जात आहे. पुरवठा विभागाच्या अधिकृत दाव्यानुसार बीड तालुक्यात ३४९ रेशन दुकाने कार्यरत आहेत. मात्र, प्रत्यक्ष पडताळणी केली असता धक्कादायक वास्तव चव्हाट्यावर आले आहे. तालुक्यात केवळ २०० दुकानदारांकडेच वैध व अधिकृत परवाने शिल्लक आहेत.उर्वरीत १४९ दुकानांपैकी अनेकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत, तर काहींचे परवाने निलंबित करून दुसऱ्या दुकानांना जोडण्यात आले आहेत. परवाने रद्द वा निलंबित असतानाही दरमहा या १४९ दुकानांच्या नावाने हजारो क्विंटल रेशनधान्याची उचल कशी होते? हे हजारो टन धान्य गरिबांच्या ताटात न जाता थेट काळ्या बाजारात कोणाच्या आशीर्वादाने विकले जात आहे? या संपूर्ण साखळीमागे पुरवठा विभागातील बड्या अधिकाऱ्यांचा वरदहस्त असलेला 'बकासुर' सक्रिय असल्याची उघड चर्चा संपूर्ण तालुक्यात रंगत आहे. शासनाकडून रेशन दुकानदारांचे अधिकृत कमिशन खात्यावर जमा होताच या 'बकासुरा'ची हमेवसुली यंत्रणा ॲक्टिव्ह होते. छोट्या रेशन दुकानदारांकडून २ हजार रुपये, मोठ्या रेशन दुकानदारांकडून ५ हजार रुपये थेट उकळले जात आहेत.

हे हप्ते वसूल करण्यासाठी पुरवठा विभागातील धेंडांनी आपले खाजगी पंटर (दलाल) बाजारात सोडले आहेत. हप्ता न देणाऱ्या दुकानदारांना परवाना रद्द करण्याची आणि कारवाईची धमकी देऊन गप्प बसवले जात आहे.

सवलतींसाठी एसटी प्रवाशांना एनसीएमसी कार्ड बंधनकारक; नोव्हेंबर अखेर नोंदणीचे आवाहन

मुंबई/प्रतिनिधी

राज्य परिवहन (एसटी)च्या प्रवासभाड्यातील सवलतींचा लाभ मिळविण्यासाठी पात्र प्रवाशांनी राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड (एनसीएमसी) नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. विशेषतः महिला प्रवाशांची नोंदणी नोव्हेंबरअखेर पूर्ण करण्यासाठी महामंडळाने प्रयत्न सुरू केले असून, ग्रामीण भागातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या निर्णयानुसार एसटीच्या विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या पात्र प्रवाशांना एनसीएमसी कार्ड उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासाठी एसटी आगार, बसस्थानके आणि प्रवाशांच्या सोयीच्या ठिकाणी अधिकृत एजन्सीमार्फत नोंदणी व कार्ड वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही प्रक्रिया सकाळी सात ते सायंकाळी सात या वेळेत सुरू असते.



महिला प्रवाशांना सवलतीचा लाभ घेताना अडचणी येऊ नयेत, यासाठी कार्ड नोंदणीला गती देण्यावर महामंडळाने भर दिला आहे. ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक यांच्यापर्यंतही ही सुविधा पोहोचविण्याचे नियोजन आहे. त्यासाठी पंचायत समिती आणि ग्रामपंचायत कार्यालयांच्या माध्यमातून विशेष नोंदणी व वितरण शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अंगणवाडी सेविका, आशा सेविका, गृहिणी आणि नोकरदार महिलांसह सर्व पात्र लाभार्थ्यांची नोंदणी सुलभ व्हावी, यासाठी स्थानिक पातळीवर समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिबिरांचे आयोजन करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी एसटीच्या विभागीय कार्यालयाशी किंवा आगार प्रतिनिधींशी संपर्क साधावा, असे महामंडळाने स्पष्ट केले आहे.

एसटीच्या सवलत योजनांचा लाभ पात्र प्रवाशांना सुलभपणे मिळावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे पात्र प्रवाशांनी विलंब न करता एनसीएमसी कार्डची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन महामंडळाने केले आहे.

एसटी महामंडळाकडून विविध सामाजिक घटकांना शासन निर्देशानुसार सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. त्यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना मिळणाऱ्या सवलतीचा समावेश आहे. या सवलतीच्या प्रवासाचे अधिक (पान २ वर)

दुष्काळी उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करा!

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आज रस्ता रोको आंदोलन

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज, सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.



पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सोमवारी सकाळी १० वाजता अहिल्यानगर-बीड मार्गावरील चराटा फाटा येथे होणार आहे.

राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेल्या ठोस उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून शेतकरी बांधव चिंताग्रस्त आहेत. शेतमजुरांच्या हाताला काम नाही, तर पशुपालकांसमोर जनावरांच्या चारा (पान २ वर)

बीडसह मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी धरणे आंदोलनात सामील व्हा-प्रा.मोराळे

बीड/प्रतिनिधी

मराठवाडा हा कायम दुष्काळग्रस्त विभाग असून सिंचनाचा अनुशेष ६० हजार कोटी आहे. ७०% क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. शेती मशागत, महागडी बी-बियाने, खते यावर खर्च करून बेभरवशाची शेती, लहरी पाऊस यामुळे शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. सरकार आमचा अनुशेष भरून काढण्यासाठी ठोस उपाय योजना करीत नाही. राजकीय अनास्था प्रशासनाची उदासीनता लोकप्रतिनिधीची निष्क्रियता यामुळे मराठवाडा मागासलेला तहानलेलाच आहे. सरकारने २०१९ ला पार-गोदावरी, उल्हास, वैतरणा, दमणगंगा खोऱ्यातील ३७० टीएमसी शिल्लक पाण्यापैकी १६८ टीएमसी पाणी बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली परभणी या जिल्ह्याला देण्याचा निर्णय घेतला असला तरी ७ वर्ष उलटूनही मराठवाड्याच्या हक्काचे मंजूर असलेले पाणी मिळावे म्हणून संपूर्ण मराठवाड्यात समन्यायी पाणी वाटप संघर्ष समिती आणि लोकलढा जन आंदोलनाच्या वतीने दिनांक ४ नोव्हेंबर पासून जिल्हाधिकारी कचेरीवर धरणे आंदोलन सुरू केले आहे बीड जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक विद्यार्थी सर्वांनी ११ वाजता हजर राहावे. असे आव्हान प्रा. सुशीलाताई मोराळे, डॉ. अण्णासाहेब शिंदे छत्रपती संभाजीनगर, माजी आमदार विजय गव्हाणे, माजी आमदार जनार्दन तुपे, दिनेश गुळवे, पंढरीनाथ लगड, बाळासाहेब मोरे, गणेश ढवळे, पंडित तुपे, प्रकाश भन्साळी, राजेंद्र आमटे, राजू गायके, रामेश्वर गाढे, ओंकार शेंबडे, पठाण सर, नारायण गाढे, उमेश शिंदे, ॲड बाळासाहेब सानप, कुलदीप करपे, परमेश्वर सातपते, सचिन लुकड, देविदास चव्हाण, डॉ. संजय तांदळे, अशोक येडे, रामधन जमाले इत्यादींनी केले आहे.

२००५ साली विलासराव देशमुख यांनी पाणी वाटपाचे धोरण जाहीर केले मात्र अजूनही मराठवाड्यावर अन्यायच केला जात आहे. पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्वाने त्यांच्या परिसरात सगळीकडे पाणी खेळवले आता विदर्भाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (पान २ वर)

वैकुंठभूमी परिसरात कायाकल्प फाउंडेशनचे स्वच्छता अभियान

दुष्काळी परिस्थितीत वृक्षांना पाणी देत जपली पर्यावरणाची बांधिलकी

धारूर/अतुल शिनगारे

किल्ले धारूर येथील सामाजिक आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात सातत्याने योगदान देणाऱ्या कायाकल्प फाउंडेशनच्या वतीने रविवारी शहरातील पोलीस ठाण्याच्या पाठीमागील वैकुंठभूमी परिसरात स्वच्छता अभियान आणि वृक्षसंवर्धनाचा उपक्रम राबविण्यात आला. सकाळी ६ ते ९ या वेळेत झालेल्या या उपक्रमात संस्थेच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तीन तास श्रमदान केले.

सध्या परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने लावलेल्या वृक्षांचे संगोपन करणे आव्हानात्मक बनले आहे.



पाण्याअभावी वृक्षांची हानी होऊ नये, यासाठी फाउंडेशनच्या सदस्यांनी पाण्याची व्यवस्था करून वैकुंठभूमी परिसरातील वृक्षांना पाणी दिले. केवळ वृक्षारोपण करून थांबण्याऐवजी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन आणि संवर्धन करण्यावर संस्थेने (पान २ वर)

जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत सुरक्षित बचपन अभियान उत्साहात संपन्न



धारूर/अतुल शिनगारे

बालकांचे शोषण रोखणे, बालहक्कांचे संरक्षण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वसंरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, धारूर येथे सुरक्षित बचपन अभियान उत्साहात संपन्न झाले. धारूर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धारूर तालुका दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश एन. एम. वाली होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मुख्याध्यापक रमेश रुद्रे, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. परमेश्वर शिनगारे, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय कोकणे, केंद्रप्रमुख सुदर्शन काळे आदींचा समावेश होता. प्रास्ताविकात (पान २ वर)

02 Nov 2026 page 2_Layout 1 11/2/2026 1:27 AM Page 1

प्रसूतांवरील अन्याय पाहून व्यथित झाले संत हृदय

(पूज्य संत श्री आशारामजी बापूजींचा विश्व हितकारी संदेश)

आई बनणाऱ्या महिलांवर आज घोर अन्याय होत आहे तो पाहून व्यथीत झालेल्या पूज्य संत श्री आशारामजी बापूजींच्या श्री मुखातून निघालेला विश्व हितकारी संदेश कित्येक पदव्या डिग्री मिळवलेले अनेक डॉक्टर माझे शिष्य आहेत आता काही दिवसापूर्वी दिल्ली जवळचा एक डॉक्टर आला आणि म्हणाला बापू मी एक सर्जन साहेबांसोबत गाडीने जात होतो ते भल्या पहाटे भरधाव वेगाने गाडी चालवत होते तेव्हा मी त्यांना विचारले साहेब तुम्ही इतक्या वेगाने गाडी का चालवत आहात ते म्हणाले आमच्या हॉस्पिटलमध्ये एका महिलेची डिलिव्हरी होणार आहे जर नॉर्मल डिलिव्हरी झाली तर शिकार हातातून निसटून जाईल मी गाडी यासाठी वेगाने चालवीत आहे की त्या बाईला समजावून घाबरवून सिजेरियन केले तर ग्राहक ही बनवून राहील आणि पैसेही मिळतील अरे! तू सर्जन आहेस की काय आहेस देव जाणे! पण माझ्या हृदयाला अशा

सर्जनांच्या व्यवहारामुळे मोठी पीडा होते जे अन्याय करून पैसे कमवितात एखाद्या बाईचा जीव धोक्यात टाकतात भारताच्या नारीला शिकार मानणाऱ्या सर्जन! तुझ्या बुद्धीचे ऑपरेशन ईश्वर केव्हा करेल? ओम ओम ओम ओम जागृती आली पाहिजे भारतात!.... निर्दोष महिलावर होणारा अत्याचार बंद झाला पाहिजे. *चांगल्या निस्वार्थ व भीती दाखवून ऑपरेशन करीत नाहीत अशा डॉक्टरांना तर मी खूप स्नेह करतो परंतु लुटारू आत्याचाऱ्यांची संख्या वाढत आहे म्हणून माझे हृदय व्यथित (पीडित) होत आहे* आनीतिच्या मार्गाने पैसे लुटण्यासाठी जे गर्भस्थ शिशुच्या विकासात काहीतरी कमी असल्याचे सांगून अबॉर्शन गर्भपात करतात किंवा महिलांना घाबरवून जे सिजेरियन करतात त्यांच्यापासून तुम्ही सावध राहा भले कोणाची मुलगी सून बनवून आली असेल आई-वडिलांचे सासू-सासऱ्यांचे पतीचे कर्तव्य आहे की कोणत्याही किमतीवर तिच्या जीवाचे रक्षण करावे डॉक्टर म्हणतात पोट चिरून बाळ बाहेर काढू तुला काहीच कळणार दुखणार नाही अरे कळणार का नाही कारण ते तिला बेशुद्ध करतील पण जेव्हा शुद्धीवर येईल तेव्हा तिला कळेलच ना! मग तिला वेदना होऊ लागल्या तर तुम्ही पेन किलर द्याल पेन किलर वर पेन किलर खाऊ घालून तिची आयुष्य का बरबाद करता नैसर्गिक रीतीने होणाऱ्या प्रसूतीत आई बनणाऱ्या देवींना पीडा वेदना सहन करावी लागली तर ती सहन करा पण पोट चिरण्याची पीडा कधीच स्वीकारू नका मुलींनो देवींनो मी हात जोडतो हा धोका आहे अत्याचार आहे तुमच्यासोबत ! तुम्ही बाळाला जन्म देऊन ईश्वराच्या सृष्टी एक प्रकारचा यज्ञ कर्म करीत आहात सुयोग्य मुलांना जन्म दिला तर हा तर यज्ञ आहे हा यज्ञ करणाऱ्या महिलांसोबत इतका जुलूम! ''हे भगवान ! कलियुग तर आता पूर्ण जोमात आले आहे महिला सोबत जो जुल्म होत आहे त्याच्यामुळे मी खूप व्यथित आहे खूप दुःखी आहे. *देशी गाईच्या शेणाचा रस पाजून सामान्य प्रसूती होऊ शकते* गोधरा गुजरात मध्ये समितीचा अध्यक्ष होता रेवाचंद तेलवाला त्याच्या सुनेचे पाय वगैरे सुजले होते डॉक्टरने सांगितले गर्भ वाकडा झाला आहे सिझेरियन करावे लागेल. गोधराच्या डॉक्टरांचे त्याने ऐकले नाही वडोदराच्या डॉक्टरांनी ही तीच गोष्ट सांगितली तेव्हा तो सुनेला आमदाबादला घेऊन गेला मला रेवाचंद चा फोन आला तो म्हणाला मी कित्येक डॉक्टरांची कॉन्फरन्स करविली बाबा सर्वजण म्हणतात की सिजेरियन साठी लवकर सही करा एक तर बाळ वाचेल किंवा आई. आणि जर बाळ वाचले तर ते मानसिकरित्या अविकसित मंद होईल सिजेरियन ने एकाचा तरी जीव वाचावा जर उशीर केला तर दोघेही मरतील मी म्हटले कोणत्याही ऑपरेशनची गरज नाही बाळ असेच जन्माला येऊ शकते तुम्ही देशी गाईच्या शेणाचा दहा मिली ताजा रस पाजा प्रसुती आपोआप होईल सामान्य प्रसूती झाली कन्या सुधा जिंदाबाद जिवंत आहे तिची आई सुद्धा जिंदाबाद आहे जिवंत आहे आणि आता त्या कन्याचे लग्न झाले ती सुद्धा आई बनली ही गोष्ट मी छिंदवाड्याच्या सत्संगात सांगितली एका बाईने दोनदा सिजेरियन केले होते माझा सत्संग ऐकता ऐकता तिने पक्का निश्चय केला की डॉक्टर काही म्हणोत आता मी सिझेरियन वीणाच प्रसूती करेन जेव्हा मी पुन्हा तेथे गेलो तेव्हा ती बाई आली आणि म्हणाली ''बाबा ! मी जेव्हा आई बनणार होते तेव्हा गावात माझ्या आई-वडिलांकडे निघून गेले मी विचार केला की छिंदवाड्यात राहिले तर प्रसूतीच्या वेळी घरचे मला मोठ्या दवाखान्यात घेऊन जातील आणि तेथे डॉक्टर म्हणेल की दोनदा सिजरियन झाले आहे तेव्हा तिसरे बाळ सिजरियन शिवाय होऊ शकणार नाही प्रसूतीच्या वेळी दाई ला बोलण्यात आले बाबा मी तुम्ही सांगितल्यानुसार गाईच्या शेणाचा थोडासा रस भगवंताचा नाम जप करून घेतला तिसऱ्या बाळाचा जन्म सामान्य प्रसूतीने झाला'' अशा ही महिला आहेत की दोन मुले सिजेरियन ने झाली आहेत तेव्हा तिसरे मूल सिजर शिवाय होऊ शकत नाही असे बोलणार यांनाच याचे प्रत्यक्ष प्रमाण दिले की अशा परिस्थितीतही नैसर्गिक प्रसूती होऊ शकते महिलांनो तुमच्यात खूप ताकद आहे जे लोकांना घाबरवून सिझेरियन किंवा अबोर्शन करतात करविता अशा लोकांना देव सद्बुद्धी देवो मी तर म्हणतो की डॉक्टरांच्या वेशात अश्विनी कुमारांसारखे देवांचे वैद्य पवित्र डॉक्टर भगवंताने पाठवावेत अशा डॉक्टरांना मी खूप प्रेम करतो दुर्जन सज्जन बनावे सज्जनांना शांती मिळो शांत आत्मा आपल्या मुक्त स्वरूपाचा अनुभव करोत आणि मुक्त पुरुष इतरांना मुक्तीच्या मार्गावर घेऊन जावो ही वेदवाणी आहे माझ्याकडे एक भगवद भक्त आला आणि म्हणाला बापूजी तुम्ही मुलीला मुलगा बनविले काही वर्षांपूर्वीची घटना आहे उल्हासनगरच्या एका भक्ताने आपल्या पत्नीची तपासणी सोनोग्राफी करून घेतली तेव्हा समजले की मुलगी आहे त्याला अगोदर मुली होत्या म्हणून अबॉर्शन करायला सांगितले त्याने मला विचारले तेव्हा मी म्हटले की करू नको भगवंताची दया होईल मग चार महिन्यांनी दुसरीकडे तपासणी करायला गेले त्याने विचारले अगोदर केली आहे का तर तो म्हणाला हो अगोदरच्या व्यक्तीने काय सांगितले मुलगी असल्याचे सांगितले आहे तेव्हा त्याने तपासणी करण्याचे नाटक केले आणि मनाला हो मुलगी आहे आता तो भक्त गोंधळात पडला की आधीच मुली आहेत ही सुद्धा मुलगी आहे तो मला म्हणाला बाबा हे लोकही मुलगी असल्याचे सांगतात मी म्हटले भाऊ तू धीर धर भगवंत सर्व ठीक करतील बघ काय होते ते त्याला मुलगा झाला तो म्हणाला बाबा तुम्ही भगवंत आहात मुलीला - मुलगा बनवून टाकले मी म्हटले नाही बनविले मुलगाच होता बस! माझ्या हृदयातून भगवंतांनी बोलवून घेतले प्रसूतीमुळे होणाऱ्या अन्यायासाठी सर्व समाजातून सर्व धर्मियांनी आवाज उठविला पाहिजे मी एका न्यायाधीशाच्या आई वडिलांना धन्यवाद देतो माझी गोष्ट ऐकून कायदा बनविला की गर्भाचे भ्रूण लिंग परीक्षण हा कायदेशीर अपराध आहे असे सिजेरियनलाही कायदेशीर अपराध सारखे काही बनविले बहाद्दर लोकांनी तर भले होईल अत्याचार्यांवर लगाम बसेल जो असा विचार करतो की नॉर्मल डिलिव्हरी झाली तर शिकार हातून गेली तो पुढे कोणत्या योनिमध्ये जाईल त्या बिचारा डॉक्टरला ठाऊकच नाही त्यांना अनेक अनेक नीच योनीमध्ये जाऊन खूप दुःख भोगावे लागेल बेईमानीने कमविलेला पैसा इथेच पडून राहील पण केलेले चुकीचे कर्म खूप काही दुःख भोगावे लागतील याशिवाय सुटका नाही म्हणून अशा डॉक्टरांनी वेळीच स्वतःला सावरले पाहिजे कित्येक निर्दोष महिलांचे आयुष्य खराब होत आहे सिजेरियन मुळे अरे मनुष्य असून असा क्रूर का बनलास ? सर्जन साहेब तुझ्या साहेब ची अशी तशी होईल मुले मुली आणि तुझी तब्येत तुला खूप त्रास देईल महिला सोबत अन्याय करू नका महिलावरही अन्याय कोणावरी अन्याय का करायचा ? पोटापाण्याची सुविधा तर आपोआप होते आपल्याकडून कोणाची फसवणूक होईल असे का करावे ? हे हरी! हे हरी !मला तर असे वाटते की त्यांचेही मंगल व्हावी हे सुद्धा पापापासून वाचावेत महिलांना या अत्याचारापासून वाचविण्यासाठी तुम्ही आपापल्या भागात क्षेत्रात काळजी घ्या एकमेकांना समजवा आणि याचा सोशल मीडिया वगैरे माध्यमातून प्रचार करा खरं सांगतो असेही काही जेज /न्यायाधीश प्रगट होतील जे सिजेरियन वर निर्बंध बंदी आणणारा कायदा बनवतील मग अत्याचारावर लगम बसेल जे काही होईल मी काही कोणाला आदेश देत नाही प्रार्थना करतो ज्याच्याकडून जे शक्य असेल ते करावे आणि निर्दोष यांना वाचवावे सर्व जातीधर्मीयांनी मिळून मिसळून राहा सुसंवाद साधा संघटित होऊन जगा गर्भपात करविणारे बिचारी १० जन्मापर्यंत आपत्यासाठी आक्रोश करीत राहते हे शास्त्र वचन आहे गर्भपात आणि सिझेरियन वर बंदी यावी हे कालांतराने नक्कीच होईल कोणता ना कोणता असा मार्ग निघेल कोणत्याही डॉक्टरचे आहित करण्याची माझी इच्छा नाही महिलावर होणारा जुलूम बंद व्हावा बस ! इतकीच माझी सर्वांना हात जोडून विनंती आहे हसत राहणे माझी सवय आहे प्रसन्न राहणे माझा स्वभाव आहे आणि तुम्हाला जागृत करणे हे माझा उद्देश आहे आणि तुमच्या सोबत होत असलेल्या अन्यायाला दूर करणे हा सुद्धा माझा उद्देश बनला आहे कुटुंब व्यवस्थित कोणाकडून मोठ्या प्रमाणावर अन्याय होऊ लागतो तर तो दूर करणे सुद्धा माझा उद्देश बनला आहे काही दिवसापूर्वी व्हॅलेंटाईन डे ची हवा निघून गेली मातृ - पितृ पूजन दिवस लाखो कुटुंबामध्ये कित्येक देशांमध्ये साजरा होत आहे आता हे जे सिजेरियन आणि भ्रूणहत्या बद्दल सांगितले त्यांच्या प्रति इतर देशातील माझे साधक सावध होतील सर्वजण सावध होतील ज्यांना सर्वांचे दुःख आपले दुःख वाटते ज्यांना इतर सर्वांचे व्यथा आपली व्यथा वाटते अशा संतावर मी जीव ओवाळून टाकेल अशा संतहृदयाविषयी काय बोलले जाऊ शकते जे कित्येक वर्षापासून समाजाची पीडा दूर करणारी सेवा कार्य व लोक जागृतीच्या उपक्रमांमध्ये मुळे स्वतःवर होत असलेला घोर। , अन्याय मुखपणे सहन करत आहे तरी समाजाच्या पिडेने व्यतीत आहेत.


सबका मंगल सबका भला ऋषी प्रसाद मासिक पत्रिकेतून संकलित अंक ४०६ हरी ओम युवा संघटना बीड माजलगाव ,परळी अंबाजोगाई ग्रुप

सेवापूर्ती सन्मान सोहळा...माणसे जिंकली स्वभावाने, विश्वास मिळविला कर्तृत्वाने!

३४ वर्षांची प्रामाणिक सेवा... माणुसकी, स्पष्टवक्तेपणा आणि कर्तव्यनिष्ठेचा अनोखा संगम; साहेबराव महादेव भताने यांच्या सेवापूर्तीचा गौरव!

एखाद्या व्यक्तीची ओळख त्याच्या पदावरून होत नसते, तर त्याने आपल्या कर्तृत्वातून किती माणसे जोडली, किती लोकांना न्याय दिला आणि समाजासाठी किती प्रामाणिकपणे योगदान दिले, यावरून त्याचे व्यक्तिमत्त्व घडत असते. शासकीय सेवेत अनेक अधिकारी-कर्मचारी येतात आणि जातात; मात्र आपल्या कामाचा ठसा सामान्य माणसांच्या मनावर उमटवणारी माणसे विरळाच असतात. अशाच कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि लोकाभिमुख व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे साहेबराव महादेव भताने पंचायत समिती परळी वैजनाथ येथे विस्तार अधिकारी (पंचायत) म्हणून कार्यरत असलेले साहेबराव भताने हे ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० ऑक्टोबर २०२६ रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून निवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवापूर्तीचा हा क्षण केवळ एका कर्मचाऱ्याच्या निवृत्तीचा नसून, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीच्या मूल्यांचा गौरव करण्याचा आहे. संघर्षातून कर्तृत्वाचा प्रवास...साहेबराव भताने यांनी रा. भतानवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड या गावचे १६ जून १९९३ रोजी पंचायत समिती अंबाजोगाई येथे ग्रामसेवक म्हणून आपल्या शासकीय सेवेला प्रारंभ केला. ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींच्या माध्यमातून शासनाच्या योजना सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांनी अत्यंत निष्ठेने पार पाडली. सौदना, गुट्टेवाडी, खापरटोन, बाभळगाव, निरपणा, सोमणवाडी, बागझरी, उजनी, पट्टीवडगाव, मुरबी, तेलघणा, आंबलवाडी, घाटनांदूर, साळुंकवाडी, नबाबवाडी आणि हनुमंतवाडी अशा अनेक गावांमध्ये त्यांनी ग्रामसेवक म्हणून काम पाहिले.

गावाचा विकास हा केवळ कागदावरील योजनांमधून होत नसतो, तर त्यासाठी लोकसहभाग, नियोजन आणि प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक असते, याची जाणीव ठेवून त्यांनी काम केले. गावातील सामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि गरजू कुटुंबांच्या प्रश्नांना प्राधान्य देत शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला. स्वच्छता अभियानातून गावाचा नावलौकिक...अंबाजोगाई तालुक्यातील निरपणा ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक म्हणून कार्यरत असताना संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. गावातील स्वच्छता, गाजरगवत निर्मूलन, परिसर स्वच्छता, गुरांची स्वच्छता आणि सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन अशा विविध कामांना त्यांनी लोकसहभागाची जोड दिली. ऑक्टोबर २००५ मध्ये त्यांच्या प्रयत्नांतून निरपणा गावाने तालुक्यात विशेष नावलौकिक मिळवला. गावाला २५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. तसेच निर्मलग्राम अभियानातील उल्लेखनीय कामगिरीमुळे गावाला राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्ली येथे ५० हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सरपंच जाधव आणि ग्रामसेवक साहेबराव भताने यांचा गौरव करण्यात आला. हा गौरव केवळ एका ग्रामसेवकाचा नव्हता, तर लोकसहभागातून गावाचा चेहरामोहरा बदलण्याच्या विचारांचा विजय होता. गावाच्या विकासासाठी लोकसहभागाचा ध्यास... २००८ ते २०१४ या कालावधीत परळी पंचायत समितीअंतर्गत मोहा, कन्हेरवाडी आणि सिरसाळा येथे त्यांनी काम केले. कन्हेरवाडी ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असताना २०११-१२ मध्ये घरकुल योजनेचे ४६ प्रस्ताव मंजूर करून घेण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. तसेच अजय बुरांडे याच्या मार्गदर्शनातून मोहा येथे ४०० घरकुल प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे. कन्हेरवाडी तंटामुक्त गाव अभियानात सक्रिय सहभाग घेत त्यांनी गावाला पाच लाख रुपयांचे बक्षीस मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. गावातील सामाजिक सलोखा आणि एकोपा टिकविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पूर्वी गल्लीगल्लीत स्वतंत्र गणपती प्रतिष्ठापना होत असताना एक गाव, एक गणपती ही संकल्पना त्यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने प्रत्यक्षात आणली. गावात गणपती मंदिर उभारण्याच्या कामातही त्यांनी पुढाकार घेतला. लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि नागरिकांना एकत्र आणून सामूहिक प्रयत्नांतून मंदिराचे काम पूर्णत्वास नेण्यात त्यांनी योगदान दिले. पाणीप्रश्न सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न...ग्रामीण भागातील पाणीटंचाईची समस्या ओळखून त्यांनी विविध गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांच्या नियोजनासाठी विशेष प्रयत्न केले. सोमणवाडी आणि निरपणा या गावांमध्ये जलस्वराज्य अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनांचे प्रस्ताव तयार करण्यापासून ते योजनांच्या अंमलबजावणीपर्यंत त्यांनी योगदान दिले. योजनांमुळे गावांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू होण्यास मदत झाली. उजनी गावात पाण्याची समस्या गंभीर असताना नदी खोलीकरणाच्या कामासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले. पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्याच्या कामामुळे जलसाठ्यात वाढ होण्यास मदत झाली. परिणामी गावातील पाणीटंचाई कमी होण्यासह शेतीला



दिलासा मिळाला. त्यांच्या कार्यकाळात जलसंधारण, पाणीपुरवठा आणि ग्रामविकासाची कामे लोकसहभागातून करण्यावर भर राहिला. पट्टीवडगाव, उजनी आणि मुरबी ही गावे २०१६-१७ मध्ये हागणदारीमुक्त करण्याच्या कामातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या उत्कृष्ट कार्याची नोंद जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्यांच्या सेवा पुस्तकात करण्यात आली. संघटनात्मक नेतृत्व आणि सहकाऱ्यांचा विश्वास...शासकीय कामकाजाबरोबरच कर्मचारी संघटनेच्या माध्यमातूनही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्षपद भूषविताना ग्रामसेवकांच्या अडचणी, प्रश्न आणि न्याय्य मागण्यांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सहकाऱ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि प्रशासनासोबत समन्वय साधणे ही त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये राहिली. प्रशासकीय कामाचा मोठा अनुभव, स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांमध्ये त्यांनी विश्वासाचे नाते निर्माण केले. विस्तार अधिकारी म्हणून समन्वयाची जबाबदारी... २०२२ मध्ये पंचायत समिती परळी वैजनाथ येथे विस्तार अधिकारी (पंचायत) म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या पदावर काम करताना परळी तालुक्यातील सुमारे ९० ग्रामपंचायतींच्या कामकाजात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ग्रामपंचायत विकासाचे सूक्ष्म नियोजन, शासकीय योजनांची अंमलबजावणी, प्रशासकीय कामकाज आणि ग्रामपंचायत स्तरावरील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

अधिकारी, कर्मचारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधत त्यांनी पंचायत विभागाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. कोविडसारखे संकट असो अथवा नैसर्गिक आपत्ती, प्रत्येक परिस्थितीत जनसेवेची भूमिका त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. शासकीय सेवेला केवळ नोकरी न मानता ती सामान्य माणसाची सेवा आहे, या भावनेतून त्यांनी आपला सेवाप्रवास सुरू ठेवला. संत गाडगेबाबांच्या विचारांचा कृतीतून आदर्श... संत गाडगेबाबा यांनी समाजाला स्वच्छतेचा, श्रमप्रतिष्ठेचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा आणि सेवाभावाचा संदेश दिला. त्यांचे विचार केवळ प्रवचनातून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून जगण्याची शिकवण देतात. ''माणसाने आपल्या कर्तृत्वाने मोठे व्हावे, पदाने नव्हे. समाजाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे,'' हा संत गाडगेबाबांच्या विचारांचा आशय साहेबराव भताने यांच्या कार्यप्रवासातून अधोरेखित होतो. गावाच्या स्वच्छतेपासून ते पाणीप्रश्नापर्यंत, घरकुल योजनेपासून ग्रामविकासापर्यंत आणि कर्मचारी संघटनेपासून प्रशासकीय समन्वयापर्यंत त्यांनी प्रत्येक जबाबदारी सेवाभावाने पार पाडली. त्यांच्या कामातून श्रमप्रतिष्ठा, लोकसहभाग आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये दिसून येतात. कुटुंबाची जबाबदारी आणि कर्तव्याचा समतोल... शासकीय सेवेत प्रामाणिकपणे योगदान देताना त्यांनी कौटुंबिक जबाबदारीही तितक्याच समर्थपणे पार पाडली. पत्नी गृहिणी असून, मुलगा आणि मुलगी या दोघांना उच्चशिक्षित करण्याचे कर्तव्य त्यांनी पार पाडले. कुटुंबाच्या पाठबळावर आणि स्वतःच्या मेहनतीवर त्यांनी आयुष्याचा प्रवास यशस्वी केला. मातृभक्ती, साधेपणा, स्पष्टवक्तेपणा आणि कामाप्रती असलेली निष्ठा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये राहिली आहेत. पद संपते, पण माणसांच्या मनातील स्थान कायम राहते... ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शासकीय सेवेतून निवृत्त होताना साहेबराव भताने यांच्या हातातील प्रशासकीय जबाबदारी संपत असली, तरी त्यांनी जोडलेली माणसे, केलेली विकासकामे आणि निर्माण केलेला विश्वास कायम राहणार आहे. त्यांच्या सेवाकाळात भेटलेले शेकडो सहकारी, ग्रामस्थ आणि लाभार्थी यांच्या मनात त्यांच्या कार्याच्या असंख्य आठवणी आहेत. खऱ्या अर्थाने माणूस पदामुळे मोठा होत नाही, तर त्याच्या कामामुळे आणि वागण्यामुळे मोठा होतो. ३४ वर्षांच्या सेवाप्रवासात साहेबराव भताने यांनी हीच गोष्ट आपल्या कृतीतून सिद्ध केली आहे. कोणत्याही पदाचा गर्व न बाळगता कर्तव्याला प्राधान्य देणारे, सत्याची बाजू घेणारे आणि सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून काम करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेकांसाठी आदर्श ठरणारे आहे. आज त्यांच्या सेवापूर्तीचा गौरव होत असताना हा केवळ निरोप नाही, तर एका प्रामाणिक सेवाव्रतीच्या कार्याला दिलेली कृतज्ञतापूर्वक सन्मान आहे. २ नोव्हेंबर रोजी परळी वैजनाथ येथील श्रद्धा मंगल कार्यालयात आयोजित सेवापूर्ती सन्मान सोहळा त्यांच्या ३४ वर्षांच्या सेवाकार्याचा गौरव करणारा आणि सहकाऱ्यांच्या प्रेमाचा साक्षीदार ठरणार आहे.सेवेचा प्रवास थांबतो, पण सेवेतून निर्माण झालेली ओळख कधीच संपत नाही...! साहेबराव भताने साहेब, आपल्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद, समाधान आणि दीर्घायुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

पान १ वरून...

एनसीएमसी कार्ड

सुलभ व डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी एनसीएमसी कार्ड प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. सवलतीचा प्रवास अधिक पारदर्शक, डिजिटल व सुलभ करण्याच्या दृष्टीने एनसीएमसी कार्ड प्रणाली महत्त्वपूर्ण ठरणार असून, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांनी नोव्हेंबरपर्यंत एनसीएमसी कार्ड नोंदणी करून घेण्याचे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

....

अंमलबजावणी करा!

व पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. केवळ दुष्काळ जाहीर करून किंवा मदतीच्या घोषणा करून प्रश्न सुटणार नसून संकटग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदतीचा हात देण्याची गरज निर्माण झाली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून सरसकट कर्जमाफीबाबत शासनाने पुनर्विचार करावा, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत जाहीर करावी, अग्रिम आर्थिक मदत म्हणून २५ हजार रुपये द्यावेत, पीकविमा नुकसानभरपाई तातडीने वितरित करावी, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, रोजगार हमीची कामे सुरू करावीत, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात आणि दुष्काळग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. याशिवाय शेळी-मेंढीपालकांना आर्थिक मदत, गरजू कुटुंबांना मोफत धान्य, जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर नियंत्रण, दूध उत्पादकांना योग्य दर तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जासाठी स्कोअरच्या अटीत सवलत देण्याची मागणीही करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. शासनाने दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांकडून मांडण्यात येणार आहे. या रस्ता रोको आंदोलनात शेतकरी, शेतमजूर, पशुपालक तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

....

प्रा.मोराळे

विदर्भात कोट्यावधीची तरतूद करीत आहेत, मराठवाड्याच्या हातात मात्र भोपळा देत आहेत. मुख्यमंत्री महोदय विदर्भावर आईची माया करता मात्र मराठवाड्याला सावत्र आईप्रमाणे वागवता, किमान मावशीचे प्रेम तरी मराठवाड्यावर करा अशी आमची विनंती आहे. कृष्णा खोऱ्यातील २३.६६ टीएमसी पाणी बीड, धाराशिव व लातूर या जिल्ह्यासाठी २००५ ला विलासराव देशमुख यांनी छत्रपती संभाजी नगरच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर केले ते आमच्या हक्काचे तरी पाणी तात्काळ देण्यात यावे. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळावे म्हणून नदीजोड प्रकल्पाला गती देण्यात यावी. जायकवाडी धरणातून माजलगाव कुंडलिका धरण, मांजरा धरणात पाणी सोडावे जिथे नैसर्गिक उताराने पाणी जाणार नाही तिथे लिफ्ट करून पाणी द्यावे. सिंदफणा नदीवरील टाकळगाव, निमगाव, ब्रम्हनाथ येळंब बंधाऱ्याचे काम गतीने करावे. नाथापूर, कुकडगाव, ईटकुर, साक्षाळ पिंपरी, कमलेश्वर धानोरा के टी वेअर पद्धतीने नवीन बंधारे बांधावेत. श्रीक्षेत्र भगवानगड ते तालखेड तालुका माजलगाव साठी उपसा जलसिंचन योजना राबवून हक्काचे पाणी द्यावे. सर्व नद्या, बंधारे, गाव तलाव, साठवण तलाव यांना एकमेकांशी जोडून पाणी द्यावे. बीड जिल्ह्यासह मराठवाड्याचा दुष्काळ कायमचा हटवण्यासाठी उपसा जलसिंचन योजना राबवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्यात यावा. १)गोदावरी, अमृता, सिंदफणा नदी जोड प्रकल्पाला तात्काळ सुरुवात करा. २) जायकवाडीचे पाणी १९८५ ला संपले होते २०१८ ला पुन्हा सरकारने फेरनियोजन केले आता तिसऱ्यांदा फेर नियोजन करा व बीड जिल्ह्याला पाणी द्या. बीड तालुक्यातील टुकुर प्रकल्प रद्द झाला आहे हे पाणी शिल्लक आहे. ३२३ दशलक्ष घनमीटर पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. आम्हाला पुराचे पाणी नको कारण पाऊसच पडला नाही तर पूर कसा येणार त्यासाठी हक्काचे पाणी द्या. १८०० कोटी बीड जिल्ह्याच्या जलसिंचनासाठी दिले कुठे गेले. विहिरीतच पाणी नाही तर पोहऱ्यात कसे येईल. विदर्भाला ९४ हजार कोटी दिले मराठवाड्याला पण द्या. १ टीएमसी पाण्यात १० हजार हेक्टर जमीन पाण्याखाली येऊ शकते. आमचे कृष्णा खोऱ्याचे २३.६६ टीएमसी पाणी तात्काळ द्या. लाखो हेक्टर जमीन पाण्याखाली येईल. नदीजोड प्रकल्पाची तात्काळ अंमलबजावणी करा अशी मागणी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समिती आणि लोक लढा संघर्ष समितीची आहे तात्काळ नियोजन करा अशी मागणी आहे या आंदोलनात हजारोंच्या संख्येने सामील व्हा असे आव्हान समन्यायी पाणीवाटप संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

....

स्वच्छता अभियान

विशेष भर दिला आहे.यासोबतच स्मशानभूमी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. परिसरातील कचरा, गवत आणि अनावश्यक झाडाझुडपांची साफसफाई करून परिसर स्वच्छ करण्यात आला. सदस्यांच्या सामूहिक श्रमदानामुळे वैकुंठभूमी परिसराला स्वच्छ व सुंदर स्वरूप प्राप्त झाले.वृक्षारोपणाइतकेच वृक्षांचे संगोपन महत्त्वाचे असून, पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कायाकल्प फाऊंडेशनच्या वतीने शहरातील सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ, सुंदर व हरित ठेवण्यासाठी दर रविवारी विविध ठिकाणी साप्ताहिक श्रमदान उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमात फाऊंडेशनचे अध्यक्ष दिनेश कापसे, रामेश्वर गुळवे, अंकुश फुटाणे, केदार डुबे, कल्पक चिद्रवार, आप्पाराव पवार, सोमनाथ आप्पाराव पवार, सचिन चिद्रवार आदी सदस्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली.

....

सुरक्षित बचपन अभियान

ॲड.शिनगारे यांनी विद्यार्थ्यांनी अन्याय-अत्याचाराविरोधात निर्भयपणे तक्रार करण्याचे आवाहन केले. ॲड. एम. बी. भोसले यांनी गुड टच-बॅड टचमधील फरक समजावून सांगितला. वैष्णवी बडे यांनी मोबाईल वापरातील खबरदारी व बालमजुरी प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात न्यायाधीश एन. एम. वाली यांनी बालविवाह, बालमजुरी, लैंगिक शोषण आणि बालकांच्या हक्कांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच अडचणीच्या प्रसंगी चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी आरती ठाकूर व जानवी शिंदे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक रमेश रुद्रे यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटच्या पानावरून...

फोन येतो?

परिषदेकडून कोणतीही परवानगी देण्यात आली होती का? परवानगी दिली असेल तर ती कोणत्या नियमांच्या आधारे देण्यात आली? आणि परवानगी नसेल तर बांधकाम होत असताना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाई का केली नाही? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ अतिक्रमणधारकांवर कारवाई करून प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोकळे सोडू नये, अशी मागणी दीपक थोरात यांनी केली आहे.

लोकप्रतिनिधींचे राजकीय वजन प्रशासनापेक्षा मोठे आहे का?

नाथसृष्टी सार्वजनिक स्मशानभूमीच्या जागेवरील अतिक्रमण प्रकरणात लोकप्रतिनिधींच्या दबावाची चर्चा होत असेल, तर प्रशासनाच्या स्वायत्ततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही नगर परिषदेची वैधानिक जबाबदारी आहे. अतिक्रमण होत असताना संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली का, याची विभागीय चौकशी होणे आवश्यक आहे. राजकीय दबाव कोणाचाही असो, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. त्यामुळे मुख्याधिकारी मांडुरके यांनी केवळ नोटीस बजावून जबाबदारी झटकू नये, अतिक्रमण हटवून दोषींवर नियमानुसार कारवाई करावी.

अतिक्रमण रोखण्याची वेळ आली तेव्हा नगर परिषद गप्प का?

नाथसृष्टी सार्वजनिक स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होत असताना बीड नगर परिषद प्रशासन नेमके काय करत होते? सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्याची वैधानिक जबाबदारी असलेल्या संबंधित विभागाने बांधकाम सुरू असतानाच ते रोखणे अपेक्षित नव्हते का? अतिक्रमण उभे राहिल्यानंतर नोटीस बजावण्याची वेळ का आली? या संपूर्ण प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली आहे का, याची निष्पक्ष विभागीय चौकशी होणे आवश्यक आहे. केवळ अतिक्रमणधारकांना नोटीस देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. बांधकामासंदर्भात परवानगी दिली असल्यास तिची वैधता तपासावी आणि परवानगी नसताना बांधकाम झाले असल्यास जबाबदारांवर नियमानुसार कारवाई करावी. लोकप्रतिनिधींचा कोणताही दबाव असला तरी सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाच्या कर्तव्यापासून प्रशासनाला पळ काढता येणार नाही. मुख्याधिकारी मांडुरके यांनी अतिक्रमण हटवून दोषींवर कारवाई करावी, हीच नागरिकांची अपेक्षा आहे.

....

तुकाराम महाराज भारती

केली जाणारी ही परिक्रमा श्रद्धा, संयम, साधना आणि आत्मिक शांतीचा मार्ग मानली जाते. या प्रदीर्घ आध्यात्मिक यात्रेनिमित्त बेलेश्वर संस्थान परिसरासह पंचक्रोशीतील भाविक, भक्तगण आणि ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रस्थान सोहळ्यास ह.भ.प. बबन महाराज बहिरवाळ, ह.भ.प. माधव महाराज डाके, ह.भ.प. श्रीकृष्ण उबाळे महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय पवार, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, गणपत तागड यांच्यासह पंचक्रोशीतील आध्यात्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

....

आ.सईद खान

शासनाचे लक्ष वेधून स्थगिती उठवण्याची मागणी केली होती. त्यांच्या मागणीनंतर शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना दिलासा मिळाला असून, या निर्णयाचे शैक्षणिक क्षेत्रातून स्वागत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

....

अतिक्रमण हटाव

हटविण्यात आल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

अतिक्रमण हटाव मोहिमेबाबत समाजमाध्यमां मध्ये चुकीच्या अफवा पसरवू नयेत. तसेच जनतेमध्ये गैरसमज निर्माण करून सार्वजनिक कामकाजा बाबत संभ्रम निर्माण करू नये, असे आवाहन पत्रकातून करण्यात आले आहे. सदर कारवाई ही रस्ता सुरक्षा आणि वाहतूक सुरळीत राहण्यासाठी तसेच जनतेच्या हितासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता वस्तुस्थिती समजून घ्यावी आणि अंबाजोगाई शहराच्या सार्वजनिक विकासासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

रविंद्र धर्मे

उठविल्याबद्दल रवींद्र धर्मे यांचे आभार मानले आहेत. मात्र हा तात्पुरता उपाय असून, जलजीवन मिशनचे संपूर्ण काम कायमस्वरूपी व दर्जेदार पूर्ण करावे, जेणेकरून भविष्यात पुन्हा पाणी टंचाईचा प्रश्न उद्भवणार नाही, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

....

आमरण उपोषण

स्वाक्षऱ्या वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम २५ व २६ नुसार पूर्णपणे बेकायदेशीर ठरवून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

मुख्यालय स्थलांतराचा डाव आणि सीईओंची अनास्था..

पंचक्की येथील प्रशस्त जागेचा वापर न करता कार्यालय अन्यत्र भाड्याच्या जागेत किंवा हज हाऊसमध्ये हलवण्याच्या हालचालींमागे कोणाचे लागेबांधे आहेत, असा आरोप करण्यात आला आहे. त्याचबरोबर, छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यालयात महिन्यातील किती दिवस मुख्य कार्यकारी अधिकारी हजर असतात, याची अधिकृत हजेरी जाहीर करण्याचे थेट आव्हान देण्यात आले आहे.दररोज १५० ते २०० नागरिक आपल्या हक्काच्या कामांसाठी दूरवरून येतात, मात्र त्यांच्यासाठी कार्यालयात बसायला अवघी तीन आसने आहेत. जनतेच्या पैशांवर मौजमजा करणाऱ्या अधिकाऱ्यांना सामान्य नागरिकांना मूलभूत सुविधा देता येत नाहीत, यावरून संताप व्यक्त होत आहे.

आरपारची लढाई: दोषींवर कारवाई झाल्याशिवाय उपोषण मागे नाही!

या गंभीर गैरप्रकारांसंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वक्फ मंत्री, अल्पसंख्याक आयोग आणि पोलीस आयुक्तांना पुरावे सादर करण्यात आले आहेत. ''वक्फ ही सामान्य जनतेची अमानत आहे, अधिकाऱ्यांची खासगी जहागीर नाही. आता प्रशासनाने निव्वळ टोलवाटोलवी थांबवून उच्चस्तरीय चौकशी करावी आणि दोषींना तुरुंगात धाडावे. मागण्या पूर्ण होईपर्यंत जागेवरून हलणार नाही,''असा निर्वाणीचा इशारा उपोषणकर्ते मोहम्मद खमरुल इमान खान जफर खान नाज यांनी दिला आहे.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा परळी वै., जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.डि.वाय.रायरीकर यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५९७/२०२६

शारदाबाई ज्ञानोबा गुट्टे वि. निरंक

(मार्फत ॲड.के.टी.गोलेर परळी वै.)

अर्जदार -

१. शारदाबाई भ्र.ज्ञानोबा गुट्टे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड

२. तुकाराम पि.ज्ञानोबा गुट्टे, वय २२ वर्षे, धंदा शेती, रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड

३. विश्वजीत पि.ज्ञानोबा गुट्टे, वय २१ वर्षे, धंदा शेती, रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड

४. प्रतिक्षा भ्र.दिपक लटपटे, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा.कोद्री, ता.गंगाखेड जि.परभणी

५. सुमनबाई भ्र.नाथराव गुट्टे, वय ७६ वर्षे धंदा घरकाम, रा.नंदनंज, ता.परळी वै. जि.बीड

ज्याअर्थी **मयत ज्ञानोबा पि.नारायण गुट्टे हे/हया दिनांक ०९/०५/२०२३ रोजी मौजे हेळंब, ता. परळी वै. जि. बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत ज्ञानोबा पि.नारायण गुट्टे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०७/१२/२०२६

स्वाक्षरीत/-	**स्वाक्षरीत/-**
कनिष्ठ लिपीक	**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, परळी वै.	**सह दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वै.**

02 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/2/2026 12:01 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | सोमवार दि.०२ नोव्हेंबर २०२६ | पान ३

शेतातून सोयाबीनचे १० कट्टे लंपास; चोरट्यांनी साधला संधीचा फायदा!

मंठा/प्रतिनिधी

मंठा तालुक्यात शेतमालाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शेतात कष्टाने पिकवलेल्या सोयाबीनवर चोरट्यांनी डल्ला मारत तब्बल १० कट्टे सोयाबीन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीत शेतकऱ्याचे अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, ऐन शेतीच्या हंगामात शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला आहे. देवडाणा (ता. मंठा) येथील गणेश भारत घनवट (वय २२) या तरुण शेतकऱ्याने मंठा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या गट क्रमांक ३३ मधील ७५ आर शेतजमिनीत सोयाबीनचे पीक घेतले होते. १६ ऑक्टोबर रोजी हार्वेस्टरच्या साहाय्याने सोयाबीन काढणी करण्यात आली होती. त्यातून एकूण १८ कट्टे सोयाबीन भरून ठेवण्यात आले होते.

दरम्यान, २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास सोयाबीनचे कट्टे शेतात ठेवण्यात आले होते. त्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता शेतकरी शेतात सोयाबीन पाहण्यासाठी गेले असता, तेथे ठेवलेल्या १८ कट्ट्यांपैकी केवळ ८ कट्टे दिसून आले. उर्वरित १० कट्टे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरीस गेलेल्या सोयाबीनच्या प्रत्येक कट्ट्यात अंदाजे ५० किलो माल होता. प्रतिक्विंटल सहा हजार रुपये बाजारभावानुसार या १० कट्ट्यांची किंमत सुमारे ३० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. शेतात दिवसरात्र कष्ट करून पिकवलेला शेतमालच सुरक्षित नसेल, तर शेतकऱ्यांनी शेतीचा माल जपायचा तरी कसा? असा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित होत आहे. मंठा पोलिसांनी या चोरीचा तपास करून अज्ञात चोरट्यांचा शोध घ्यावा आणि चोरीस गेलेला शेतमाल परत मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी गणेश घनवट यांनी केली आहे.

दवाखाना बंद, बियाणे गायब, अधिकारी गप्प! पशुसंवर्धन विभागाच्या कारभाराचा पंचनामा!

मंठा/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पशुवैद्यकीय विभागाचा कारभार दिवसेंदिवस चर्चेचा विषय ठरत असून, देवगाव नायगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्याबाबत यापूर्वी बातम्या प्रसिद्ध करूनही परिस्थितीत कोणताही ठोस बदल झाल्याचे दिसत नाही. नायगाव येथे चालविण्यात येणारा संबंधित दवाखाना बंदच राहत असल्याची तक्रार गावकरी आणि शेतकरी करीत आहेत. विशेष म्हणजे, दवाखान्याच्या पाठीमागे राहणाऱ्या शेतकऱ्यांनीच दवाखाना नियमित बंद असल्याचे सांगितल्याने विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दवाखान्याच्या शेजारी राहूनही जनावरांवर मोफत उपचार नाहीत!

दवाखान्याच्या परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांकडे गाय, बैल, शेळ्या यांसारखे पशुधन आहे. मात्र, जनावर आजारी पडल्यास शासकीय दवाखान्यात उपचार मिळत नसल्याने खासगी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून पैसे मोजून उपचार करून घ्यावे लागत असल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली आहे. शासनाकडून पशुपालकांसाठी मोफत लसीकरण आणि उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश असताना प्रत्यक्षात त्याचा लाभ कुठे मिळतो आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

मोफत चारा बियाणे गेले कुठे?

(पशुवैद्यकीय विभागाचा कारभार कोणाच्या भरोशावर? कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा अभाव; वरिष्ठ अधिकारी शेशीकांत शिंदे यांच्या निदर्शनास आणूनही परिस्थिती जैसे थे!)

पशुपालकांसाठी शासनाकडून उपलब्ध करून दिले जाणारे मका, ज्वारी आणि बाजरी यांसारख्या चारा पिकांच्या बियाण्यांचे वाटप शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नसल्याची तक्रार आहे. दवाखान्याच्या अगदी शेजारी राहणाऱ्या शेतकऱ्यांनाच मोफत चारा बियाणे मिळत नसेल, तर तालुक्यातील दूरवरच्या गावांतील पशुपालकांपर्यंत ही मदत पोहोचली असेल का? शासनाकडून आलेले बियाणे नेमके कुठे गेले, त्याचे वाटप कोणाला करण्यात आले आणि त्याची नोंद कुठे आहे, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

दवाखान्याच्या पाटीवरही माहिती नाही; संपर्क साधायचा तरी कसा?



दवाखान्याच्या कामकाजाची वेळ, संबंधित पशुवैद्यकीय डॉक्टरांचे नाव आणि संपर्क क्रमांक याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याची तक्रार ग्रामस्थ करीत आहेत. शासनाच्या पैशातून लाखो रुपयांचे वेतन घेणारी यंत्रणा जनतेला वेळेवर सेवा देण्यासाठीच आहे. मग पशुपालकांना डॉक्टरांचा संपर्क क्रमांक मिळू नये, दवाखाना सुरू आहे की बंद हे समजू नये आणि उपचारासाठी खासगी डॉक्टरांकडे पैसे मोजावे लागावेत, ही परिस्थिती नेमकी कोणामुळे निर्माण झाली?

वरिष्ठ अधिकारी श्रीकांत शिंदे यांच्या निदर्शनास आणूनही कारवाईचे काय?

या संपूर्ण प्रकरणाची माहिती तालुका स्तरावरील वरिष्ठ अधिकारी शशिकांत शिंदे यांच्या निदर्शनास बातमीच्या माध्यमातून आणून देण्यात आली आहे. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामकाजात सुधारणा झाल्याचे किंवा दवाखाना नियमित सुरू झाल्याचे दिसत नसल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियंत्रण आणि देखरेखीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

दवाखाना बंद राहत असल्याच्या तक्रारी असूनही संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई झाली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. वरिष्ठांनी वेळीच दखल घेऊन कारवाई केली असती, तर दवाखाना नियमित सुरू झाला असता आणि चारा बियाणे वाटपाबाबतही पारदर्शकता आली असती, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

आता चौकशी केवळ कागदावर नको, प्रत्यक्ष कारवाई हवी!

देवगावच्या नावावर दवाखाना, नायगाव येथे प्रत्यक्ष कामकाज, पण पशुपालकांना सेवा मिळण्याबाबत अनिश्चितता, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हा पशुसंवर्धन विभागाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करावी. दवाखान्याची उपस्थिती नोंदवही, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, मोफत लसीकरणाचा तपशील, चारा बियाणे खरेदी व वितरणाच्या नोंदी तपासाव्यात.

शासनाचा पैसा वेतनावर खर्च होतो, सुविधा कागदावर दाखवल्या जातात; पण प्रत्यक्षात जनावरांच्या उपचारासाठी शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांकडे पैसे मोजावे लागत असतील, तर या व्यवस्थेचा उपयोग तरी काय?

दवाखाना नियमित सुरू होणार कधी? मोफत लस आणि चारा बियाणे पशुपालकांपर्यंत पोहोचणार कधी? आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची जबाबदारी निश्चित होणार कधी? या प्रश्नांची उत्तरे आता पशुसंवर्धन विभागाने द्यावीत.

दुष्काळ निर्मूलनासाठी पथदर्शी प्रकल्प सी एस आर शासनाच्या माध्यमातून राबविण्याचा निर्धार



कळंब/प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकविकास मंचच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरात सरकार व सामाजिक उत्तरदायी समिती त्यांच्या सहकार्यातून दुष्काळ निर्मूलन कार्य गतिमान करण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सरकारसोबत समन्वय घेऊन करून विविध विकास कामे करून दुष्काळ प्राची दाहकता कमी करण्यासाठी महाराष्ट्र लोकविकास मंच पुढाकार घेईल असे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी केले. कळंब जिल्हा धाराशिव येथे दोन दिवशी दुष्काळ निर्मूलन परिषदेच्या अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या दोन दिवशी परिषदे विविध ठराव मांडण्यात आले असून त्याच प्रामुख्याने शेतमशागतीची कामे ही रोजगार हमीच्या माध्यमातून गतिमान तिने करण्यात यावी पिण्याचे पाणी व त्याचे स्त्रोत बळकटीकरण करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना संस्थांच्या माध्यमातून प्रभावीपणे राबवावी भूमी शेतमजूर व शेतकऱ्याना शासनाने तातडीचे आर्थिक मदत करावी मायक्रो फायनान्स कंपन्यांचे कर्ज माफ करण्यात यावे यासह रोजगार निर्मितीसाठी कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी च्या माध्यमातून जिल्हास्तरावर स्वयंसेवी संस्थांना सोबत घेऊन राज्य शासनाने कार्य करावे यासाठी सर्व स्वयंसेवी संस्था शासनास सर्वतोपरी मदत करतील असे त्यांनी सांगितले.

पिण्याच्या पाण्याचा साठा जपून ठेवा; इतर वापरासाठीचा पाणीपुरवठा तात्काळ बंद करा

जालना/प्रतिनिधी

आगामी काळात उद्भवणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून पिण्याच्या पाण्याचा साठा जपून ठेवावा. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी राखीव असलेल्या साठ्यातून इतर वापरासाठी केला जाणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

भोकरदन शहराला खडकपूर्णा येथून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने डॉ. कनवारिया यांनी जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी पाणीपुरवठा व्यवस्थेची माहिती घेत उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यावर भर दिला. तसेच जुई मध्यम प्रकल्प आणि पद्मावती प्रकल्पालाही भेट देऊन तेथील पाणीसाठ्याची पाहणी केली. आगामी कालावधीत



पाण्याची संभाव्य टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहावा, यासाठी पाण्याचा वापर नियंत्रित करणे गरजेचे आहे. पिण्यासाठी राखीव असलेल्या पाण्याचा इतर कामांसाठी वापर होणार नाही, याची दक्षता संबंधित यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश डॉ. कनवारिया यांनी दिले. जलसाठ्यांचे नियोजन करताना भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून उपलब्ध पाणी जपून वापरणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पाण्याचा अपव्यय टाळणे, पिण्याच्या पाण्याच्या साठ्याचे संरक्षण करणे आणि पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवणे, या बाबींना प्राधान्य देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. या पाहणी दौऱ्यावेळी कार्यकारी अभियंता गजानन जंजाळ, उपअभियंता नरेंद्र ठाकूर, शाखा अभियंता हर्ष सुलताने, शाखा अभियंता अभिजीत बोर्डे, ग्रामविकास अधिकारी समाधान सोनवणे, रमेश दोड, विस्तार अधिकारी अंकुश काकडे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदानाचा अधिकार बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; आ.नारायण कुचे यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

जालना, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ : माय भारत, जालना आणि रावसाहेब पाटील दानवे फार्मसी महाविद्यालय, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विकसित भारत युवा संवाद ' या कार्यक्रमाचे आयोजन रावसाहेब पाटील दानवे फार्मसी महाविद्यालयात उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये मतदानाच्या अधिकाराबाबत जागरूकता निर्माण करणे, लोकशाही प्रक्रियेचे महत्त्व पटवून देणे आणि मतदार म्हणून त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे, माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे, महाविद्यालयाच्या प्राचार्य ललिता भगुरे आणि युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय माय भारत चे युथ आयकॉन आशुतोष सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करताना युवकांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढविणे आणि त्यांना मतदानाच्या अधिकाराबाबत जागरूक करणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. देशाच्या विकासात युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, जागरूक आणि जबाबदार मतदार घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार नारायण कुचे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका आणि प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मतदान हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार असून, प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या मतदानाच्या अधिकाराचा योग्य वापर करणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थ्यांनी मतदानासंदर्भातील नियम, प्रक्रिया आणि आपल्या हक्कांविषयी जागरूक राहावे, असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदानाचे अधिकार आणि प्रक्रियेसंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. आमदार नारायण कुचे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. या संवादामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेविषयी अधिक माहिती मिळाली आणि मतदानाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. यानंतर माय भारतचे युथ आयकॉन आशुतोष सिंग यांनी मतदानाचे अधिकार आणि प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांनी या विषयावर सादरीकरणाद्वारे विविध बाबी स्पष्ट केल्या. मतदार यादीतील नावाचे महत्त्व, मतदानासाठी आवश्यक असलेली जागरूकता आणि मतदार म्हणून प्रत्येकाने आपल्या अधिकारांची माहिती करून घेण्याची गरज याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेची माहिती समजून घेण्यास मदत झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षल व्यवहारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. गजानन मोगल, जयपाल राठोड, प्रा. अविनाश चव्हाण, प्रा. इब्राहिम कुरेशी, प्रा. शामल भोसले, प्रा. प्राची मुरकुटे, ऑफिसर सेजल काबरा, शंकर गोरे, ऋतुजा तांबे, बुधवत सुरज, रितिक मुळे, अमोल बनकर, अक्षय देवकर, आकाश पुसे, शिवम नागरे, अण्णा पुरे भूषण आणि जालिंदर होळकर यांनी परिश्रम घेतले.

'कॉन्स्टेबलकडे १०० कोटी, तर अधिकाऱ्यांकडे किती?'-ॲड.धन्नावत यांचा सवाल

विशेष प्रतिनिधी

जालना: मुलीच्या शाही लग्नात उधळलेला पैसा एका पोलीस कर्मचाऱ्याला चांगलाच भोवला आहे. इंदूर येथील पोलीस ट्रेनिंग कॉलेजमध्ये (झढउ) कार्यरत असलेला हेड कॉन्स्टेबल फिरोज खान याच्याकडे लोकायुक्तांच्या छाप्यात तब्बल १०० कोटी रुपयांच्या आसपास बेहिशेबी मालमत्ता उघडकीस आली आहे. या महाघोटाळ्यावर प्रतिक्रिया देताना, 'महाराष्ट्रातही असे अनेक कॉन्स्टेबल आहेत, जर एका साध्या कॉन्स्टेबलकडे १०० कोटी असू शकतात, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किती माया असेल?' असा संतप्त आणि थेट सवाल ॲड. महेश धन्नावत यांनी उपस्थित केला आहे.

असा झाला भांडाफोड...

या संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश एका व्हायरल व्हिडिओमुळे झाला. फिरोज खान याच्या मोठ्या मुलीचा विवाह इंदूरमधील अतिशय आलिशान अशा ग्रँड शेरेटन आणि रॉयल पॅलेस हॉटेलमध्ये पार पडला. या शाही लग्नसोहळ्यात लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली. हवेत नोटा उडवतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि थेट लोकायुक्त अधिकाऱ्यांचे लक्ष या 'करोडपती' कॉन्स्टेबलकडे गेले. एका चुकीमुळे त्याचे सर्व काळे कारनामे चव्हाट्यावर आले.

१०० कोटींचा आकडा आणि छुप्या गुंतवणुकी

सध्या लोकायुक्त टीमकडून फिरोज खान याच्या विविध ठिकाणांवर कसून छापेमारी सुरू असून, आतापर्यंत ६४ कोटी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता अधिकृतपणे उघड झाली आहे. खान याने 'स्पार्कवेव्ह रिॲलिटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' नावाची रिअल इस्टेट कंपनी उभी केली होती. या कंपनीच्या माध्यमातून स्वतःच्या, पत्नीच्या आणि साथीदारांच्या नावे मोक्याच्या ठिकाणी कोट्यवधींचे भूखंड लाटले आहेत. गुप्तपणे मिळत असलेल्या माहितीवरून जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तेचा आकडा सहज १०० कोटींच्या पार जाईल, असा अंदाज तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या काळ्या धंद्यात आणखी काही बड्या धेंडांचा पैसा गुंतलेला असण्याची शक्यता असून बँक खात्यांची कसून चौकशी सुरू आहे.

ॲड. महेश धन्नावत यांचा प्रशासनावर घणाघात

इंदूरच्या या धक्कादायक घटनेचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले आहेत. यावर बोलताना ॲड. महेश धन्नावत यांनी प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर ताशेरे ओढले आहेत. ते म्हणाले, 'महाराष्ट्रातही असे अनेक कॉन्स्टेबल आहेत ज्यांच्याकडे बेहिशेबी मालमत्ता आहे. विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की, जर एका साध्या कॉन्स्टेबलकडे एवढी अफाट संपत्ती असू शकते, तर या व्यवस्थेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किती माया दडलेली असेल? एवढा प्रचंड भ्रष्टाचार करून आणि १०० कोटींचे घबाड सापडूनही हा अधिकारी कायद्याच्या पळवाटा शोधून पुन्हा मोकाट सुटणार तर नाही ना, हा खरा प्रश्न आहे.' या प्रकरणाने पोलीस दलातील भ्रष्टाचाराची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, हे पुन्हा एकदा समोर आणले असून, आता या प्रकरणातील बड्या माशांवर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

रेडियम व दिशादर्शक फलक न लावल्यास तीव्र आंदोलनाचा मराठा महासंघाचा इशारा

जालना/प्रतिनिधी

शहरात निष्पाप नागरिकांचे अपघात होऊन बळी जाण्याची किंवा गंभीर जखमी होण्याची वाट महापालिका प्रशासन पाहत आहे का, असा संतप्त सवाल करत नुकत्याच उड्डाण पुलावरून ट्रक खाली कोससळून घडलेल्या भीषण अपघाताच्या घटनेने महानगरपालिकेचा ढिसाळ कारभार, रस्त्यांची दुरवस्था आणि प्रशासकीय अनास्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणली आहे. या धोकादायक वळणावर आणि अपघातप्रवण क्षेत्रात महापालिकेने वेळीच लक्षवेधी रेडियम फलक, गतिरोधक अथवा स्पष्ट दिशादर्शक बोर्ड लावले असते, तर ही दुर्दैवी घटना टळली असती, असा थेट आणि घणाघाती आरोप मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख यांनी केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते शेख हबीब मामू यांच्यासमवेत अरविंद यांनी घटनास्थळाची पाहणी करत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. हा रस्ता केवळ सामान्य वाहतुकीचा नसून अत्यंत संवेदनशील आणि गजबजलेला आहे. लगतच्या परिसरात माजी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने आहेत. इतकेच नव्हे, तर याच मार्गावर संस्कार प्रबोधिनी शाळा आणि सुरेखा प्राथमिक शाळा यांसारखी महत्त्वाची शैक्षणिक संकुले आहेत. दररोज हजारो लहान शाळकरी मुले, त्यांचे पालक, वृद्ध नागरिक आणि नोकरदार वर्गाची येथून मोठी वर्दळ असते. एवढा व्हीआयपी आणि संवेदनशील परिसर असूनही सुरक्षिततेचे साधे प्राथमिक उपाय न योजणे हा मनपा प्रशासनाचा अक्षम्य हलगर्जीपणा असल्याचे अरविंदराव देशमुख यांनी म्हटले आहे. प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त करताना अरविंद देशमुख म्हणाले की, महापालिकेच्या कारभाराला नेमकी कोणाची नजर लागली आहे? की अधिकारी कुणाच्या तरी मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहेत? हा प्रश्न आहे. रस्त्यांच्या देखभालीवर आणि सुरक्षेच्या नावाखाली दरवर्षी कोट्यवधी रुपयांच्या निविदा निघतात, मात्र प्रत्यक्षात रस्त्यांवर साधा एक चमकणारा रेडियमचा बोर्ड किंवा रात्री दिसणारा दिशादर्शक लावण्याची तसदीही घेतली जात नाही. समोर लहान मुलांच्या शाळा आणि लोकप्रतिनिधींचे बंगले असतानाही डोळ्यावर पट्टी बांधून बसलेल्या अधिकाऱ्यांना सामान्य जनतेचा जीव कवडीमोलाचा वाटतो का? हा निव्वळ अपघात नसून प्रशासकीय निष्काळजीपणामुळे घडलेली मानवनिर्मित आपत्ती आहे. अशा प्रकारचा जीवघेणा निष्काळजीपणा यापुढे कदापि सहन केला जाणार नाही. शेख हबीब मामू यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

दैनिक जगमित्र आवृत्ती कार्यालय मंमादेवी शॉपिंग सेंटर दु. नं.१ रेल्वे स्टेशन रोड मस्तगड जुना जालना मो. ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.०२ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



महिला उद्योजिकांच्या व्ही.डी.एफ. बाजाराला लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

उद्घाटनानंतर दुसऱ्या दिवशीही नागरिकांची मोठी गर्दी; 'स्वस्त दिवाळी... मस्त दिवाळी' संकल्पनेतून माफक दरात खरेदीची संधी, २०० महिला उद्योजिकांचा सहभाग

लातूर । संतोष सोनवणे

महिला उद्योजिकांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ मिळावे, त्यांच्या व्यवसायाला चालना मिळावी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिवाळीच्या खरेदीसाठी माफक दरात विविध वस्तू उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विलासराव देशमुख फाउंडेशनच्या पुढाकारातून लातूर येथील क्रीडा संकुलावर आयोजित करण्यात आलेल्या 'व्ही.डी.एफ. बाजार २०२६'ला लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शुक्रवारी (दि.३० ऑक्टोबर) दिमाखात उद्घाटन झाल्यानंतर आज शनिवारी (दि.३१ ऑक्टोबर) बाजाराच्या दुसऱ्या दिवशीही नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत खरेदीचा आनंद घेतला. 'स्वस्त दिवाळी... मस्त दिवाळी' या संकल्पनेतून आयोजित या बाजारात तब्बल २०० महिला उद्योजिकांनी सहभाग नोंदविला असून, विविध वस्तूंच्या स्टॉलवर ग्राहकांची गर्दी पाहायला मिळत आहे.





आमदार अमित देशमुख महापौर जयश्रीताई सोनकांबळे उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या हस्ते दिमाखात उद्घाटन!

या बाजाराचे उद्घाटन माजी मंत्री तथा लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित देशमुख यावेळी लातूरच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर ड. स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, गटनेते विजयकुमार साबदे, डॉ. शिवाजी जवळगेकर, ड. किरण जाधव, जिल्हा परिषद सदस्या सईताई गोरे, थोरमोठे सोनाली रमेश, सौ आशाताई शिवाजीराव भिसे, योगिता उमाकांत जाधव, सौ.दिपाली प्रदीप आदमाने यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यंदा लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना दिवाळी सण साजरा करताना आर्थिकदृष्ट्या परवडणारी खरेदी करता यावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. त्याचबरोबर स्थानिक महिला उद्योजिकांच्या कला, कौशल्य, मेहनत आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे.

दुसऱ्या दिवशीही नागरिकांची मोठी गर्दी!

उद्घाटनानंतर पहिल्याच दिवसापासून या बाजाराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, आज दुसऱ्या दिवशीही कुटुंबीयांसह खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय होती. विविध वस्तूंचे आकर्षक स्टॉल, दर्जेदार उत्पादने आणि माफक दर यामुळे ग्राहकांना खरेदीसाठी एकाच ठिकाणी उत्तम पर्याय उपलब्ध झाले आहेत. या बाजारात गृहपयोगी वस्तू, आकर्षक हस्तकला साहित्य, विविध खाद्यपदार्थ, सजावटीच्या वस्तू, दिवाळी फराळ, भेटवस्तू तसेच सणासुदीसाठी आवश्यक असलेल्या विविध वस्तूंचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसोबतच स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना ग्राहकांकडून पसंती मिळत आहे.

२०० महिला उद्योजिकांना व्यवसायाची हक्काची बाजारपेठ!

महिला भगिनींनी स्वतःचा उद्योग सुरू करून स्वबळावर उभे राहण्याचा घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. त्यांच्या मेहनतीचा, जिद्दीचा आणि आत्मविश्वासाचा सन्मान व्हावा, या भावनेतून सौ.अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिला उद्योजिकांना आपली उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवून त्यांची विक्री करता यावी, यासाठी जवळपास २०० स्टॉलची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून महिलांना आपल्या उत्पादनांची ओळख निर्माण करण्याची, नवीन ग्राहक जोडण्याची आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्याची मोठी संधी मिळत आहे. महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ, ग्राहकांना माफक दरात खरेदी आणि स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती, अशी या उपक्रमाची बहुआयामी उद्दिष्टे आहेत.

१ नोव्हेंबरपर्यंत खरेदीची संधी; लातूरकरांना आवाहन!

गतवर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ३० व ३१ ऑक्टोबर तसेच १ नोव्हेंबर असे तीन दिवस हा बाजार सुरू राहणार आहे. त्यामुळे रविवारी (दि. १ नोव्हेंबर) हा बाजार पाहण्याची आणि दिवाळीची खरेदी करण्याची शेवटची संधी लातूरकरांना उपलब्ध आहे. या बाजाराच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक संगीताताई मुळवणे, प्रीतमताई जाधव, प्रवीण सूर्यवंशी, गजानन बोयने आणि सोमनाथ कावळे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. महिला उद्योजिकांच्या कर्तृत्वाला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळ देणारा आणि सर्वसामान्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारा 'व्ही.डी.एफ. बाजार २०२६' हा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरत असून, दुसऱ्या दिवशी मिळालेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या उपक्रमाच्या यशस्वितेची साक्ष देत आहे.

मलाबार डे निमित्त मलाबार गोल्डच्या लातूर शाखेतर्फे गंजगोलाई परिसरात स्वच्छता मोहीम!

सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छतेचा जागर; अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

लातूर । संतोष सोनवणे

सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या लातूर शाखेच्या वतीने मलाबार डे निमित्त शहरातील ऐतिहासिक गंजगोलाई परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. व्यावसायिक जबाबदारीसोबतच सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून स्वच्छ, सुंदर आणि निरोगी शहराचा संदेश देण्यात आला.

मलाबार गोल्ड अँड डायमंड्स ही आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक असलेली कंपनी ग्राहकांचा विश्वास आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्याबरोबरच विविध सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवत असते. याच सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून मलाबार डे निमित्त देशभरातील कंपनीच्या विविध शाखांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत लातूर शाखेने शहराच्या मध्यवर्ती आणि ऐतिहासिक महत्त्व असलेल्या गंजगोलाई परिसराची स्वच्छता केली. या मोहिमेत मलाबार गोल्डच्या लातूर शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे सहभाग घेत परिसरातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली. स्वच्छता ही केवळ महानगरपालिका किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला, तरच स्वच्छ आणि सुंदर शहराची संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे टाळणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा सकारात्मक प्रयत्न या अभियानातून करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे शोरूम मॅनेजर तानाजी जगताप, असिस्टंट स्टोअर हेड निब्रास बशीर, तसेच कर्मचारी संजीवनी जाधव, साधना रायमल, कविता भोसले, गणेश स्वामी आणि मोहम्मद अस्लम यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



मलाबार डेच्या निमित्ताने केवळ व्यावसायिक उत्सव साजरा न करता समाजाप्रती असलेली जबाबदारी ओळखून स्वच्छता अभियानासारखा उपक्रम राबविण्यात आला. कंपनीच्या लातूर शाखेने घेतलेला हा पुढाकार सामाजिक सहभाग, पर्यावरणाविषयीची जाणीव आणि नागरिकांच्या स्वच्छतेच्या सवयींना प्रोत्साहन देणारा ठरला. या उपक्रमातून 'स्वच्छ शहर, सुंदर शहर आणि निरोगी समाज' घडविण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे, असा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

तिरू नदीवरील बंधारे दुष्काळात कोरडेच!

जळकोट । प्रतिनिधी

तिरू नदीवरील बंधाऱ्यांच्या उभारणीसाठी जळकोट तालुक्यात तब्बल ११७ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, दुष्काळी परिस्थितीत हे बंधारे कोरडे पडल्याने त्यांच्या नियोजनावर आणि प्रत्यक्ष उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जलसंधारणातून पाणीसाठा निर्माण व्हावा, भूजलपातळी वाढावी आणि शेतीला सिंचनासाठी पाणी मिळावे, या उद्देशाने उभारण्यात आलेल्या बंधाऱ्यांचा दुष्काळात शेतकऱ्यांना उपयोग होत नसेल, तर या खर्चाचा फायदा नेमका कोणाला झाला, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

पावसाचे अनिश्चित चक्र, वाढते तापमान आणि घटती भूजलपातळी यामुळे जळकोट तालुक्यातील शेतीसमोर पाण्याचे संकट उभे आहे. पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असताना नदीवरील बंधाऱ्यांमध्ये अपेक्षित पाणीसाठा नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या कामांचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे. केवळ बंधारे बांधणे म्हणजे जलसंधारण नव्हे. पाण्याची आवक, अडविण्याची क्षमता, गाळ साचण्याचे प्रमाण, गळती, देखभाल आणि पाण्याचे व्यवस्थापन या बाबीही महत्त्वाच्या आहेत.

बंधाऱ्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती झाली का, पाणीसाठा कमी होण्यामागे नेमकी कोणती कारणे आहेत, याचा शोध घेणे आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर बंधाऱ्यांची प्रत्यक्ष जलसाठवण क्षमता किती आहे, मंजूर अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये तफावत आहे का, बांधकामाचा दर्जा कसा आहे, गाळ साचल्याने साठवण क्षमता कमी झाली आहे का, याची तांत्रिक तपासणी होणे गरजेचे आहे. तसेच या प्रकल्पांमुळे किती हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आणि प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना लाभ झाला, याची माहितीही प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.विकासकामांचा खरा निकष त्यावर खर्च झालेला निधी नसून त्यातून नागरिकांना मिळणारा प्रत्यक्ष लाभ हा असतो.

त्यामुळे तिरू नदीवरील सर्व बंधाऱ्यांची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करून त्यांची सद्यस्थिती, जलसाठवण क्षमता, बांधकामाचा दर्जा, खर्चाचा तपशील आणि लाभक्षेत्र यांचा अहवाल सार्वजनिक करणे आवश्यक आहे. कामांमध्ये त्रुटी किंवा अनियमितता आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ११७ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या बंधाऱ्यांचा दुष्काळात शेतकऱ्यांना लाभ मिळत नसेल, तर या कामांच्या उपयुक्ततेचा जाब विचारला जाणे स्वाभाविक आहे. पाणी अडविणे, पाणी जिरविणे आणि शेतीला पाणी उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पांचा मूळ उद्देश असेल, तर तो कितपत साध्य झाला, याचे उत्तर जलसंधारण विभाग आणि स्थानिक प्रशासनाने जनतेला देण्याची गरज आहे.

महिनाभरात शोधले ३४ मोबाईल; शिवाजीनगर पोलिसांची कामगिरी

लातूर । प्रतिनिधी

हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याचा आनंद आणि पोलिसांच्या तत्परतेबद्दल कृतज्ञता, असा अनुभव लातूरमधील ३४ नागरिकांना आला आहे. शिवाजीनगर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या महिनाभरात ३४ हरवलेले मोबाईल शोधून काढले. हे सर्व मोबाईल संबंधित मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी नागरिकांचे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. सातत्यपूर्ण पाठपुरावा, तांत्रिक कौशल्य आणि नियोजनबद्ध तपासाच्या जोरावर विविध ठिकाणांहून ३४ मोबाईल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. शोधून काढलेले मोबाईल संबंधित नागरिकांना पोलिस ठाण्यात बोलावून परत करण्यात आले.



हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले. ही कामगिरी पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे आणि शिवाजीनगरचे पोलिस निरीक्षक संतोष ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार लक्ष्मण कांदे, नारायण शिंदे, परमेश्वर अंकुलगे, किशोर माने आणि जब्बार पटवारी यांनी केली. हरवलेल्या वस्तूंचा शोध घेऊन त्या सुरक्षितपणे मूळ मालकांपर्यंत पोहोचविण्याच्या या कामगिरीमुळे नागरिक आणि पोलिस यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले आहे.

युवा एकनाथ देवडेची रणजी संघात धडक; अवघ्या १७ व्या वर्षी 'रणजी कॅप'

लातूर । प्रतिनिधी

राजकोट व इंदौर येथे झालेल्या विनू मंकड (१९ वर्षे) क्रिकेट स्पर्धेत रण मशीन ठरलेल्या लातूरच्या एकनाथ देवडेने ९३ च्या सरासरीने धावा ठोकत महाराष्ट्राकडून उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. या जोरावर त्याची सोमवारपासून सुरु झालेल्या वरिष्ठ गटाच्या रणजी क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. कमी वयात रणजी खेळणारा तो लातूरचा पहिला क्रिकेटपटू ठरला आहे.

१४ व १६ वर्षेवयोगटात छाप पाडणाऱ्या लातूरच्या एकनाथ (समर्थ) देवडेने आपली फलंदाजीतील लय कायम राखत यशोशिखर गाठले आहे. पुण्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू पृथ्वी शॉ च्या नेतृत्वाखाली त्याने आपली रणजी संघात निवड पक्की केली आहे. लातूरच्या पँकर्स क्लबकडून सुरुवातीचे धडे गिरवत त्याने पुण्याच्या आर्यन्स क्लबकडून खेळताना अनेक विक्रम प्रस्थापित केले. राजकोट येथे झालेल्या पश्चिम विभागीय क्रिकेट स्पर्धेत शतकांची हॅटट्रीक केली होती. या स्पर्धेत तो सर्वाधिक धावा करणारा अष्टपैलू खेळाडू ठरला होता. १६ वर्षाखालील महाराष्ट्र संघाचा तो कर्णधारही राहिला आहे. एकंदरीत जसे जसे त्याचे वय वाढत आहे, तसे तसे त्याच्या खेळातील परिपक्वताही वाढताना दिसत आहे. विनू मंकड स्पर्धेतील त्याची खेळी आपल्या रणजी निवडीसाठी निर्णायक ठरली आहे. या यशाचे माजी खेळाडू उल्हास भोयरेकर, सुशील सुडे, शफी टाके, मदन रेड्डी तसेच जिल्हा क्रीडाधिकारी जयराज मुंढे यांनी कौतुक केले आहे.



सहा सामन्यात ४ शतके

विनू मंकड क्रिकेट स्पर्धेत त्याने सहा सामन्यात ४ शतके व एक अर्धशतक पटकावले आहे. ९३ च्या सरासरीने धावा करीत स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाचा फलंदाज ठरला आहे. त्याने बडोद्या विरुद्ध ५६ चेंडूत ५० धावा केल्या. एमपीसीए विरुद्ध १२४ चेंडूत १४९, राजस्थान विरुद्ध १३४ चेंडूत १५७, मणिपूर विरुद्ध ७२ चेंडूत १०० तर तामिळनाडू विरुद्ध १२० चेंडूत १०० धावा ठोकत स्पर्धेत एकूण ५५८ धावा केल्या. महाराष्ट्राच्या संघाचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव झाला नसता तर त्याचा फॉर्म पाहता तो स्पर्धेतील सर्वोच्च धावसंख्या करणारा खेळाडू ही ठरला असता.

इथेनॉल गाडी वापरणे काळाची गरज : सहकार मंत्री पाटील

लातूर । संतोष सोनवणे

इथेनॉल गाडी वापरणे काळाची गरज असून यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होत असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी लातूर येथे केले. लातूर येथील मारुती सुझुकी अरेना शोरूममध्ये ए८५ वॅगनआर वाहनाचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला, यावेळी ते बोलत होते. यावेळी सिद्धी शुगर अलाईड इंडस्ट्रीजचे व्हाईस प्रेसिडेंट पी. जी. होनराव, जनरल मॅनेजर संजय डोईजोडे, सेल्स मॅनेजर धनंजय कोरपे, उजना मिल्क डेअरीचे मॅनेजर संदीप पाटील, अहमदपूर टीम लीडर प्रशांत आवले, धनराज चव्हाण तसेच पोलीस उपनिरीक्षक चव्हाण आदी उपस्थित होते.



यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की देशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या गाडीसाठी चालना दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे इथेनॉल निर्मिती गाडी तयार केलेली आहे. भारत देशांमध्ये ह्या अशा पद्धतीच्या २० गाड्या तयार केल्या असून महाराष्ट्रामध्ये चार गाड्या सध्या असून त्यातली एक लातूरमध्ये ही गाडी उपलब्ध करण्यात आली असून ही गाडी काळाची गरज आहे यामुळे प्रदूषण सुद्धा कमी होते यामुळे सर्वांनी येणाऱ्या काळात इथेनॉल निर्मित गाड्यांचा वापर केला पाहिजे असेही सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले. यावेळी मारुती सुझुकी या कंपनीतील विविध कर्मचारी व लातूर शहरातील विविध मान्यवर मंडळी उपस्थित होते.

गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याकडून शेतकरी सभासदांना गुळ पावडरचे वाटप सुरू

लातूर । प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ऍग्रो फूड इंडस्ट्रीज प्रा. लि. या साखर कारखान्याच्या प्रत्येक शेतकरी सभासदांना दीपावलीच्या निमित्ताने दहा किलो गुळ पावडर देण्यात येत असून कारखान्याचे संस्थापक श्री तुळशीरामअण्णा कराड आणि रणवीर राजेश कराड यांच्या हस्ते गुळ पावडर वाटपाचा शुभारंभ शनिवारी सकाळी करण्यात आला.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आग्रहाखातर रामेश्वर परिसरात उभारण्यात आलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याने यावर्षीपासून शेतकरी सभासदांची दिपावली गोड व्हावी यासाठी प्रत्येक शेतकरी सभासदांना तीस रुपये दराने दहा किलो गुळ पावडर देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला त्यानुसार आज शनिवार रोजी मौजे काटगाव येथील कारखान्याच्या गट कार्यालयात कारखान्याचे मुख्य प्रवर्तक श्री तुळशीरामअण्णा कराड आणि रणवीरदादा कराड यांच्या शुभ हस्ते गुळवाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी शेतकी अधिकारी संतोष जाधवर, रमेश सोट, प्रशांत शिंदे, आकाश कदम, दीपक शिंदे, अशोक सोट यांच्यासह कारखान्याचे कर्मचारी शेतकरी सभासद मोठ्या संख्येने होते.



संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याच्या शेतकरी सभासदांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी दहा किलो ३० रुपये दराने येत्या ५ नोव्हेंबर पर्यंत गुळ पावडर काटगाव, तांदूळजा, भोकरंबा आणि रेणापूर या कारखान्याचे गट कार्यालयातून वाटप करण्यात येणार आहे तेंव्हा सर्व शेतकरी सभासदांनी आपापल्या गट कार्यातून गुळ पावडर घेऊन जावे असे आव्हान चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

संगिता काळे (धाराशिव जिल्हा प्रतिनिधी)
मो.9588601740 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती सोमवार दि.०२ नोव्हेंबर २०२६ पान नं.५

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट!

पिण्याच्या पाण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज; प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची मागणी

लोहगाव : निजाम शेख

ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. पावसाचे अपुरे प्रमाण, भूजलपातळीत होणारी घट आणि विहिरी व बोअरवेलच्या पाणीसाठ्यात होणारी कमतरता यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागू शकते. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच नियोजनबद्ध उपाययोजना करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी, बोअरवेल आणि सार्वजनिक नळयोजनांवर अवलंबून असतो. मात्र, पाणीसाठा कमी झाल्यास नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना पाण्यासाठी होणाऱ्या त्रासाचा अधिक सामना करावा लागतो. पशुधनासाठीही पाण्याची उपलब्धता हा महत्त्वाचा प्रश्न ठरतो.

तातडीने उपाययोजना करण्याची गरज

संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी गावनिहाय पाणीटंचाईचा आढावा घ्यावा. आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा, बंद पडलेल्या नळयोजनांची दुरुस्ती, विहिरी व जलस्रोतांची पाहणी आणि पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. याशिवाय, जलसंधारणाची कामे, शेततळी, नाला खोलीकरण, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि पावसाचे पाणी साठविण्यासाठी उपाययोजना केल्यास भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्यास मदत होऊ शकते. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी नागरिकांमध्येही जनजागृती करणे आवश्यक आहे.

प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी

दुष्काळी परिस्थितीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य संकटाचा पूर्वअंदाज घेऊन नियोजन करणे महत्त्वाचे आहे. संबंधित प्रशासनाने गावागावांतील पाणीसाठ्याची स्थिती तपासून आवश्यक त्या उपाययोजना वेळेत कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पाणी ही मूलभूत गरज असून, ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेसे व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

विजेचा धक्का लागून चार शेळ्या ठार

पशुपालकाचे अंदाजे ८० हजार रुपयांचे नुकसान; भरपाई देण्याची मागणी

लोहगाव / निजाम शेख

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे विद्युत प्रवाहाचा धक्का लागून चार शेळ्या जागीच ठार झाल्याची घटना रविवार (दि. १ नोव्हेंबर) रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेत पशुपालकाचे अंदाजे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, संबंधित पशुपालकाला नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नंदगाव येथील पशुपालक तुळजाराम गुड्डे हे दिवसभर शेळ्या चारल्यानंतर सायंकाळी त्यांना घेऊन घरी परतत होते. यावेळी गावातील महावितरणच्या विद्युत खांबामध्ये पावसामुळे विद्युत प्रवाह उतरल्याने तेथून जाणाऱ्या शेळ्यांना विजेचा धक्का बसला. या दुर्दैवी घटनेत चार शेळ्या जागीच ठार झाल्या.

आधीच विविध संकटांचा सामना करणाऱ्या



पशुपालकाचे या घटनेमुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त पशुपालकाला तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली जात आहे.

नंदगाव येथे मोफत सर्व रोग निदान आरोग्य तपासणी व भव्य रक्तदान शिबिर संपन्न!

लोहगाव/निजाम

शेख तुळजापूर विधानसभेचे लोकप्रिय विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्त तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे सर्व रोग निदान शिबिर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये५१ रक्त दात्यानी रक्त दान केले. तसेच ४७० रुग्रांची आरोग्य तपासणी औषध उपचार करण्यात आले. महात्मा बसवेश्वर ब्लड सेंटर सोलापूर व अक्षय ब्लड बँक सोलापूर यांनी रक्त संकलनाचे काम पाहिले. यावेळी धाराशिव जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे यांच्या पुढाकारातून व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने तेरणा चॅरिटेबल ट्रस्ट नेरूळ नवी मुंबई,शासकीय सिव्हिल हॉस्पिटल धाराशिव व प्राथमिक आरोग्य केंद्र जळकोट यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर संपन्न झाले.शिबाराच्या शुभारंभ प्रसंगी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती सिध्देश्वर कोरे, तुळजापूर पंचायात समितीच्या उपसभापती सौ. रोहिणी विवेकानंद मिलगिरी, पंचायत समिती सदस्य भिवाजी इंगोले,विवेकानंद मिलगीरे,लक्ष्मण पाटील , किशोर धुमाळ, मल्लीनाथ गुड्डे, किशोर सुरवसे,मदन पाटील,सागर चौघुगे,रहिम शेख, अप्पू करंडे,परमेश्वर गब्बूरे, शिवानंद शरणार्थी,सचिन कोरे,सागर चौगुले यांच्यासह आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

कमांडर ब्रिगेडिअर बारबरे यांच्या हस्ते भूमिका शेंडगे व प्रमोद शुनगार या दोघांचा सन्मान

जळकोट/विजय पिसे

दि .३१ सप्टेंबर २०२६ रोजी जवाहर नवोदय विद्यालय तुळजापुर येथे चालु असलेल्या वार्षिक कँपमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट भूमिका शेंडगे हिने सप्टेंबर मध्ये दिल्ली येथे पार पडलेल्या शुटिंग स्पर्धेत भारतातुन तृतीय क्रमांक येण्याचा बहुमान प्राप्त केला होता तसेच कॅडेट प्रमोद सुनगार महाराष्ट्रातुन शुटिंग मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला होता.त्याबदल भूमिका व प्रमोद या दोघांचा सत्कार छत्रपती संभाजीनगरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर ए जी बारबरे यांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन छ .संभाजीनगरच्या ग्रुप कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.ब्रिगेडिअर बारबरे यांनी यावेळी कॅडेटसना मार्गदर्शन करताना युवकांमध्ये एनसीसीची स्थापना ज्या उदेश्याने केली आहे ते म्हणजे



युवकांमध्ये अनुशासन, नेतृत्व, शिस्त, अथक परिश्रम, आत्मविश्वास याचे पालन करून देशाची, समाजाची सेवा करावी असे आव्हान त्यांनी यावेळी केले . एनसीसीची बी व सी प्रमाणपत्र परीक्षा पास होणाऱ्या कॅडेटसना एसएसबी, सीडीएस परीक्षा देऊन सरळ अधिकारी होण्याची तयारी करावी .तसेच स्पर्धा परीक्षा,अधिकारी,सैन्यदल,पोलीस, बीएसएफ, सीआरपीएफ, सीआयएसएफ,रेल्वे,अशा विविध क्षेत्रात विशेष संधी एनसीसी प्राप्त करून देते.तसेच आज एनसीसी लातूर बटालियनच्या अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील कॅडेटसनी सलग दोन वर्ष दिल्ली येथे जाऊन एक अनोखी ओळख वैभवी शेंडगे,अर्जुन पाचंगे यांच्या माध्यमातुन केली आहे . ऑल इंडिया स्तरावर प्रजासताक दिन कँप, फायरिंग,ड्रिल,खेळ, ऑबस्टिकल,थल सैनिक कँप, एक भारत श्रेष्ठ भारत ,राष्ट्रीय एकात्मता, ट्रेकिंग,माऊंटरिंग अशा वेगवेगळ्या कँपमध्ये स्वतःची अनोखी ओळख कॅडेटसनी निर्माण केली आहे तसेच या कॅडेटसना आदर्श मानुन नविन भरती झालेल्या एनसीसी कॅडेटसनी आपले नावलौकिक कमवावे असे या कँपदरम्यान आपल्या शिबीराच्या मार्गदर्शन प्रसंगी बारबरे यांनी व्यतित केले.

मानमोडी शाळेच्या विद्यार्थ्यांना रंगोत्सवमध्ये गोल्ड, सिल्वर मेडल

जळकोट/विजय पिसे

जळकोट बीटमधील आयएसओ मानांकनप्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मानमोडी येथील विद्यार्थ्यांनी रंगोत्सव सेलिब्रेशन अँड ऑर्गेनायझेशन फॉर नॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, ६ विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल आणि पाच विद्यार्थ्यांना देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जळकोट बीट विस्तार अधिकारी श्री. जट्टे एन.जी, प्रमुख पाहुणे कम्प्युटर्सचे संचालक लक्ष्मीकांत पाटील, शालेय व्यवस्थापन समिती माजी उपाध्यक्ष सौ. शुभांगी सुरवसे, शिक्षण प्रेमी श्री. दिनेश राठोड, मुख्याध्यापक विक्रम पाचंगे, सहशिक्षक मोहिते रामकृष्ण, श्रीमती सुचिता चव्हाण, सौ. शालुबाई कदम शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमध्ये उतरणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी पालक शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन विद्यार्थी गुणवत्ता कशी वाढेल. यासाठी प्रयत्नशील राहावे. असे श्री जट्टे यांनी आपले मत व्यक्त केले तर सध्याचे युग हे संगणकाचे युग असून प्रत्येक विद्यार्थ्याने संगणकाच्या माध्यमातून प्रगती करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

समतेच्या क्रांतीचा महामार्ग : महात्मा फुलेंच्या विचारांनी घडवलेला नवा भारत!

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजव्यवस्था म्हणजे जातिभेद, स्त्रीदास्य,अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमतेच्या बेड्यांनी जखडलेले वास्तव होते.जन्मावरून माणसाची प्रतिष्ठा ठरत होती.स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला जात होता.विधवांचे आयुष्य सामाजिक बंधनांनी उद्ध्वस्त केले जात होते. अस्पृश्यतेच्या नावाखाली माणसाला माणसापासून दूर ठेवले जात होते.अशा अंधारलेल्या काळात एका तरुणाने समाजव्यवस्थेलाच प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवले.त्या तरुणाचे नाव होते महात्मा जोतीराव फुले ! त्यांनी केवळ अन्यायाविरुद्ध आवाज उठवला नाही,तर अन्याय निर्माण करणाऱ्या व्यवस्थेच्या मुळावरच घाव घातला.त्यांच्या या परिवर्तनवादी लढ्याला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची समर्थ साथ लाभली.या दाम्पत्याने भारतीय समाजाला नव्या विचारांची,नव्या मूल्यांची आणि मानवी प्रतिष्ठेची दिशा दिली.

समाजसुधारणा नव्हे, समाजक्रांतीचा ध्यास

महात्मा जोतीराव फुले (११ एप्रिल १८२७ ते २८ नोव्हेंबर १८९०) हे आधुनिक भारताच्या जडणघडणीतील प्रमुख शिल्पकारांपैकी एक होते.त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता माणूस आणि त्याचे जन्मसिद्ध अधिकार.स्वातंत्र्य, समता,बंधुता आणि न्याय ही मूल्ये त्यांनी केवळ ग्रंथांत मांडली नाहीत, तर प्रत्यक्ष जीवनात उतरवली. समाजातील लिंगभाव,जातिव्यवस्था आणि वर्गव्यवस्था ही शोषणाची तीन प्रमुख केंद्रे असल्याचे त्यांनी ओळखले.या तिन्ही व्यवस्थांविरुद्ध त्यांनी एकाच वेळी संघर्ष उभारला.शिक्षण,धर्मचिकित्सा, जातिनिर्मूलन,स्त्री-पुरुष समता, संसाधनांचे न्याय्य वाटप आणि आंतरजातीय विवाह यासारख्या कृतीकार्यक्रमांतून पर्यायी समाजव्यवस्थेचा पाया घातला. समाजाच्या जुन्या चौकटीत किरकोळ बदल करण्यापेक्षा ती चौकटच बदलण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.म्हणूनच त्यांचे कार्य केवळ समाजसुधारणेपुरते मर्यादित न राहता व्यापक समाजक्रांतीचे प्रतीक ठरले

स्त्रीशिक्षणातून परिवर्तनाची पहाट

स्त्रीशिक्षण हा फुले दाम्पत्याच्या क्रांतिकारी कार्याचा अत्यंत महत्त्वाचा अध्याय आहे.ज्या काळात स्त्रीने शिक्षण घेणे पाप समजले जात होते,त्या काळात जोतीरावांनी स्वतः सावित्रीबाईंना शिक्षित केले.पुढे १८४८ साली पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाची ऐतिहासिक मुहूर्तमेढ रोवली. स्त्री शिकली तर धर्म बुडेल,संस्कृती नष्ट होईल,अशी भीती तत्कालीन सनातनी प्रवाहाकडून व्यक्त केली जात होती. दुसरीकडे स्त्रीला केवळ चांगली गृहिणी बनण्यासाठी मर्यादित शिक्षण द्यावे,असा तथाकथित उदारमतवादी दृष्टिकोन होता.मात्र फुले दाम्पत्याने या दोन्ही भूमिकांना आव्हान दिले. त्यांच्या मते शिक्षण हा स्त्रीचा मानवी अधिकार होता.स्त्रीला स्वतःचे विचार, निर्णयक्षमता, आत्मसन्मान आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडवण्याचा पूर्ण अधिकार आहे.स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची आणि राष्ट्राची प्रगती अशक्य असल्याचा त्यांचा ठाम विश्वास होता. या कार्यासाठी त्यांना प्रचंड विरोध सहन करावा लागला.घर सोडावे लागले,अपमान सहन करावे लागले; तरीही त्यांनी आपला निर्धार ढळू दिला नाही.अनेकदा जेवायलाही फुरसत मिळत नसल्याचे उल्लेख तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये आढळतो.

शिक्षणाच्या माध्यमातून आत्मसन्मानाची जागृती

फुले दाम्पत्याच्या शाळांमध्ये केवळ अक्षरओळख करून दिली जात नव्हती. विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता,प्रश्न विचारण्याचे धैर्य आणि सामाजिक वास्तवाचे भान निर्माण केले जात होते. या शैक्षणिक वातावरणातून घडलेल्या मुक्ता साळवे या विद्यार्थिनीने १८५५ साली लिहिलेला 'मांग-महारांच्या दुःखाविषयी निबंध' भारतीय सामाजिक विचारांच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरला.अस्पृश्य समाजातील स्त्रियांच्या वेदना मांडताना तिने धर्म,जात आणि मानवी अधिकारांविषयी मूलभूत प्रश्न उपस्थित केले.

गरीब विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती रोखण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन, शैक्षणिक साहित्य आणि उपयुक्त शिक्षण यांना फुले दाम्पत्याने महत्त्व दिले. प्रौढांनाही शिक्षणाची संधी मिळावी म्हणून रात्रशाळांचा उपक्रम राबवला. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून माणसाला गुलामगिरीतून मुक्त करणारी शक्ती आहे,हा त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा गाभा होता.

तृतीय रत्न'मधून स्त्री-पुरुष समतेचा संदेश

१८५५ साली जोतीरावांनी लिहिलेले 'तृतीय रत्न' हे नाटक त्यांच्या प्रगल्भ सामाजिक विचारांचे प्रभावी उदाहरण आहे.या नाटकात शेतकरी पती-पत्नी एकत्र जेवतात आणि एकत्र शिक्षण घेण्यासाठी रात्रशाळेत जाण्याचा निर्णय घेतात.

आज हे दृश्य साधे वाटू शकते, मात्र त्या काळात पती-पत्नीने चारचौघांत एकमेकांशी बोलणेही निषिद्ध मानले जात होते.अशा वातावरणात पती-पत्नीने समानतेने वागणे,एकत्र निर्णय घेणे आणि शिक्षणासाठी घराबाहेर पडणे ही अत्यंत क्रांतिकारी कल्पना होती.

अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी जोतीरावांनी स्त्री-पुरुष सहजीवनाचे इतके प्रगत चित्र रेखाटले,ही त्यांच्या



विचारांची विलक्षण झेप होती. १८६९ साली प्रकाशित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पद्यमय चरित्रातूनही त्यांनी स्त्रियांच्या निर्णयक्षमतेचे आणि कौटुंबिक सहजीवनाचे महत्त्व अधोरेखित केले.इतिहासाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन केवळ घटनांच्या वर्णनापुरता मर्यादित नव्हता.इतिहासातून वर्तमान समाजाला परिवर्तनाचा संदेश देण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

स्त्रीच्या मानवी हक्कांसाठी निर्भीड भूमिका

जोतीरावांनी स्त्री-पुरुष विषमतेच्या मुळाशी असलेल्या पुरुषप्रधान मानसिकतेवर कठोर प्रहार केला.स्त्रीला देवी म्हणून गौरवायचे आणि प्रत्यक्ष जीवनात दासीसारखे वागवायचे,या दुटप्पी प्रवृत्तीवर त्यांनी टीका केली.

'सार्वजनिक सत्य धर्म पुस्तका'त त्यांनी स्त्री-पुरुषांनी परस्परांशी बहीण-भावंडांच्या नात्याने,निर्मळ अंतःकरणाने आणि समानतेने वागण्याचा आग्रह धरला. स्त्री ही स्वतंत्र व्यक्ती आहे.तिचे अस्तित्व केवळ पत्नी,माता किंवा मुलगी या नात्यांपुरते मर्यादित नाही.तिला पुरुषांइतकेच मानवी अधिकार आहेत,ही त्यांची भूमिका तत्कालीन सामाजिक व्यवस्थेला थेट आव्हान देणारी होती. त्यांनी सतीप्रथा आणि पुरुषांच्या बहुपत्नीत्वाच्या दुटप्पी निकषांवर प्रश्न उपस्थित केले.पुरुष पत्नीच्या मृत्यूनंतर 'सता' का जात नाही किंवा स्त्रीला दुसरा 'सवता' का करता येत नाही,असे प्रश्न विचारून त्यांनी समाजातील अन्यायकारक प्रथांचे वास्तव उघडे केले.

विधवांच्या वेदनांना दिला माणुसकीचा आधार

विधवांचे जीवन हा तत्कालीन समाजातील अत्यंत वेदनादायी प्रश्न होता.बालविवाह, पुनर्विवाहावरील बंदी,केशवपन आणि सामाजिक बहिष्कार यांमुळे अनेक स्त्रियांचे आयुष्य उद्ध्वस्त होत होते.

या परिस्थितीविरुद्ध फुले दाम्पत्याने केवळ लेखन केले नाही,तर प्रत्यक्ष कृती केली. १८६३ साली पुण्यात स्वतःच्या घरात 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू करून संकटग्रस्त विधवांना सुरक्षित आश्रय आणि प्रसूतीची सुविधा उपलब्ध करून दिली.सावित्रीबाईंनी अशा महिलांची सेवा केली.एका विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन त्याचे नाव यशवंत ठेवले आणि त्याला वैद्यकीय शिक्षण दिले.

विधवांच्या सक्तीच्या केशवपनाविरुद्ध सत्यशोधकांनी चळवळ उभारली.नारायण मेघाजी लोखंडे यांच्या पुढाकारातून नाभिक बांधवांना या अमानवी प्रथेला विरोध करण्याचे आवाहन करण्यात आले.नाभिकांचा संप हा केवळ व्यवसायाशी संबंधित प्रश्न नव्हता; तो स्त्रियांच्या मानवी प्रतिष्ठेसाठीचा नैतिक संघर्ष होता.

ताराबाई शिंदे आणि स्त्रीवादी विचारांचा उदय

फुले दाम्पत्याच्या विचारांचा प्रभाव पुढील पिढ्यांवरही पडला.सत्यशोधक विचारांनी प्रेरित ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली 'स्त्रीपुरुषतुलना' हा स्त्रीवादी विचारांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला.या ग्रंथातून पुरुषप्रधान व्यवस्थेतील अन्याय आणि दुटप्पी नैतिकतेवर कठोर टीका करण्यात आली.त्यावर टीकेची झोड उठली तेव्हा जोतीरावांनी 'सत्सार'मधून ताराबाईंच्या विचारांचे समर्थन केले.

स्त्रियांच्या दुःखाची खरी जाणीव स्त्रियांनाच अधिक समर्थपणे व्यक्त करता येते,ही त्यांची भूमिका स्त्रीच्या अनुभवविश्वाला स्वतंत्र मान्यता देणारी होती.पुढे तान्हुबाई बिर्जे यांचे संपादकीय कार्य,सावित्रीबाई रोडे यांचे सामाजिक लेखन आणि सत्यशोधक महिला परिषदांसारख्या उपक्रमांतून या विचारांचा वारसा अधिक व्यापक झाला.

सत्यशोधक विवाहातून समानतेची नवी संकल्पना

विवाहसंस्थेतील अन्यायकारक रूढींनाही जोतीरावांनी आव्हान दिले.विवाह हा दोन व्यक्तींमधील समानतेवर आधारित करार असावा,अशी त्यांची भूमिका होती. हुंडा,मानपान,अनावश्यक खर्च आणि स्त्रीला दुय्यम ठरवणाऱ्या विधींना नकार देऊन त्यांनी सत्यशोधक विवाहपद्धतीचा पुरस्कार केला.

जून १८८७ मध्ये त्यांनी 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा-विधी' ही पुस्तिका लिहिली.विवाहापूर्वी वधू-वरांनी एकमेकांचे गुण,वय, आवडीनिवडी आणि परस्पर प्रेम यांचा विचार करून निर्णय घ्यावा,असे त्यांनी सांगितले.

सत्यशोधक विवाहातील मंगलाष्टकांमध्ये वधू स्वातंत्र्य,समता आणि न्यायाची अपेक्षा व्यक्त करते,तर वर स्त्रियांच्या मानवी अधिकारांसाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतो.विवाहातील हा समानतेचा विचार त्या काळाच्या कितीतरी पुढे जाणारा होता.

'गुलामगिरी'पासून सार्वत्रिक शिक्षणापर्यंत

१८७३ साली प्रकाशित झालेला 'गुलामगिरी' हा ग्रंथ जोतीरावांच्या व्यापक मानवमुक्तीच्या विचारांचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.अमेरिकेतील गुलामगिरीविरोधी संघर्ष करणाऱ्यांना त्यांनी हा ग्रंथ समर्पित केला.

१९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर शिक्षण आयोगासमोर त्यांनी शिक्षण मोफत, सक्तीचे आणि सर्वांसाठी उपलब्ध असावे,अशी भूमिका मांडली.

शेतकरी,कष्टकरी,महिला आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना त्यांनी समाजचिंतनाच्या केंद्रस्थानी आणले.ज्ञान,संपत्ती,सत्ता आणि संधी यांचे न्याय्य वाटप झाल्याशिवाय खरी सामाजिक समता निर्माण होणार नाही,हा त्यांच्या विचारांचा मूलाधार होता.आजच्या समाजालाही फुलेंचा प्रश्न आज महिलांनी शिक्षण,विज्ञान,प्रशासन,उद्योग,क्रीडा आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवले आहे.मात्र स्त्री-पुरुष विषमता,जातीय भेदभाव,हुंडा,बालविवाह,अंधश्रद्धा आणि सामाजिक अन्याय यांचे पूर्ण उच्चाटन झालेले नाही.

म्हणूनच महात्मा फुले यांचे विचार आजही तितकेच प्रासंगिक आहेत.समाजक्रांती म्हणजे केवळ सत्ता बदलणे नव्हे,तर माणसाकडे पाहण्याची दृष्टी बदलणे. जन्मावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेऐवजी मानवी प्रतिष्ठेला महत्त्व देणे.स्त्रीला दयेचा विषय न मानता समान अधिकारांची स्वतंत्र व्यक्ती मानणे.शिक्षणाला विशेषाधिकार न समजता प्रत्येकाचा मूलभूत हक्क मानणे.

महात्मा जोतीराव फुले यांनी या विचारांसाठी संपूर्ण आयुष्य वेचले. सावित्रीबाईंनी त्याला कृतिशीलतेची जोड दिली.या दाम्पत्याने पेटवलेली परिवर्तनाची ज्योत पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरली.

फुले दाम्पत्याच्या कार्याचे खरे स्मरण म्हणजे त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांना आपल्या सामाजिक व्यवहारात स्थान देणे. कारण समता ही केवळ घोषणा नसते,ती जगण्याची पद्धत असते. आणि माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देणारी हीच विचारधारा महात्मा फुलेंच्या समाजक्रांतीचे खरे सामर्थ्य आहे !

(संदर्भ : महात्मा जोतिराव फुले ; पर्यायी समाजव्यवस्थेचे शिल्पकार – लेखक प्रा.हरी नरके)

संकलन
जिल्हा माहिती कार्यालय
धाराशिव

02 Nov 2026_Layout 1 11/2/2026 12:35 AM Page 2

बीड नगरपालिकेच्या हद्दीत स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होताना लोकप्रतिनिधींचा दबाव चालत होता का, आता कारवाईच्या वेळी प्रशासनाला कोणाचा फोन येतो?

अतिक्रमण उभे राहताना अधिकारी गप्प का होते? मुख्याधिकारी मांडुरके आणि मोहितेंनी आता नोटीस नव्हे, थेट बुलडोझर चालवून दोषींवर कारवाई करावी!

बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील अंकुश नगर परिसरातील नाथसृष्टी सार्वजनिक स्मशानभूमीच्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाचा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. स्मशानभूमीच्या कंपाउंड वॉलवर खासगी बांधकाम करून सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करण्यात आल्याची तक्रार पुढे आली असतानाच नगर परिषदेने २८ ऑक्टोबर रोजी संबंधितांना सात दिवसांत अतिक्रमण हटविण्याची नोटीस बजावली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात लोकप्रतिनिधींचा दबाव असल्याची चर्चा सुरू असतानाही मुख्याधिकारी मांडुरके आणि सहाय्यक रचनाकार बळीराम मोहिते यांनी अतिक्रमण हटविण्याच्या दृष्टीने नोटीस काढल्याने प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. मात्र, अतिक्रमण होईपर्यंत नगर परिषद प्रशासन नेमके काय करत होते, हा खरा प्रश्न आहे.

बीड नगरपालिकेतील सत्तांतरानंतर शहरात विविध ठिकाणी अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे आणि जागांवर कब्जे होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. मात्र, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या नगर परिषद प्रशासनाने वेळीच कारवाई का केली नाही? नाथसृष्टी स्मशानभूमीच्या कंपाउंड वॉलवर खासगी बांधकाम उभे राहत असताना संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी झोपले होते का? बांधकाम सुरू असताना ते रोखले का नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित



होत आहेत.

दरम्यान, या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. संपादक दीपक थोरात यांनी दि.३० ऑक्टोबर रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. स्मशानभूमीच्या कंपाउंड वॉलवर करण्यात आलेले बांधकाम पूर्णपणे अनधिकृत असून त्यामुळे सार्वजनिक स्मशानभूमीची जागा कमी होत आहे. या अतिक्रमणामुळे स्मशानभूमीच्या पवित्रतेसह सार्वजनिक वापरावरही परिणाम होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

अतिक्रमणधारकांना नोटीस बजावणे ही केवळ सुरुवात आहे. संबंधित बांधकामासाठी नगर (पान २ वर)

नर्मदा परिक्रमेसाठी श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांचे प्रस्थान!

भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती; पुष्पहार व औक्षण करून दिल्या आध्यात्मिक यात्रेसाठी शुभेच्छा

लिंबागणेश : (दि. १) बीड तालुक्यातील बालाघाटाच्या डोंगररांगांमध्ये वसलेल्या श्रीक्षेत्र ईश्वरभारती बाबा बेलेश्वर संस्थानचे उत्तराधिकारी महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांनी रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी नर्मदा परिक्रमेसाठी प्रस्थान केले. यावेळी त्यांनी बेलेश्वर संस्थान, बेलगाव येथील महादेवाचे तसेच सद्गुरू ईश्वरभारती बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन आपल्या आध्यात्मिक यात्रेला सुरुवात केली.



याप्रसंगी उपस्थित भाविकांनी महंत तुकाराम महाराज भारती यांना पुष्पहार अर्पण करून शुभेच्छा दिल्या, तर सुवासिनी महिलांनी औक्षण करून त्यांना निरोप दिला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या प्रस्थान सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

नर्मदा परिक्रमा ही भारतीय आध्यात्मिक परंपरेतील अत्यंत पवित्र आणि खडतर धार्मिक यात्रा मानली जाते. नर्मदा मातेच्या तीरावरून (पान २ वर)

बीड शहर मालमत्ता मोजणी, मोजमाप, सर्वेक्षण, करिता प्रभाग क्रं.२५ सह

बीड शहरातील नागरिकांनी सहकार्य करण्याचे भाजपा युवा नेते नगरसेवक ॲड.गोविंद भैय्या शिराळे पाटील यांचे आवाहन

बीड/प्रतिनिधी



नगर परिषद बीड अंतर्गत शहरात चतुर्थ वार्षिक कर आकारणी संदर्भात मालमत्तांच्या मोजमापाचे काम सुरू करण्यात आले आहे. नगरसेवक तथा भाजपा युवा नेते ॲड.गोविंद भैय्या शिराळे पाटील यांनी प्रभाग क्र. २५ सह संपूर्ण बीड शहरातील नागरिकांना या मोजणी प्रक्रियेत कर्मचाऱ्यांना सकारात्मक सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

बीड नगर परिषद हद्दीतील सर्व निवासी घरे, दुकाने आणि व्यावसायिक गाळ्यांच्या अचूक मोजमापाचे हे काम मे.कोअर प्रोजेक्ट इंजिनिअरिंग अँड कन्सल्टंट प्रा.लि. अमरावती या अधिकृत कंपनीला सोपवण्यात आले आहे. या मोहिमेद्वारे शहरातील मालमत्तांची अद्ययावत नोंदणी केली जाणार आहे, जी शहराच्या नियोजित विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

मालमत्ता मोजणी हे शहराच्या कर रचनेतील आणि विकासातील एक कायदेशीर व आवश्यक पाऊल आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता, आपल्या घरी किंवा दुकानावर मोजणीसाठी येणाऱ्या कंपनीच्या अधिकृत कर्मचाऱ्यांना योग्य ती माहिती देऊन सहकार्य करावे. मालमत्ता मोजणीच्या वेळी नागरिकांनी आपल्या मालमत्तेशी संबंधित आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी, जेणेकरून भविष्यात कर आकारणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, असेही प्रशासनाच्या वतीने सांगण्यात येत असून, प्रभाग २५ मधील आणि बीड शहरातील सर्व सुजाण नागरिकांनी नगर परिषदेच्या या मोहिमेला यशस्वी करावे, असे आवाहन भाजपा युवा नेते नगरसेवक ॲड.गोविंद भैय्या शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

राहुल गांधी यांच्या रामलीला मैदानावरील आंदोलनाच्या समर्थनात बीड तालुका व शहर काँग्रेसचे आंदोलन

बीड/प्रतिनिधी



वोट चोर गद्दी छोड चा नारा देत मतदार प्रक्रियेत झालेल्या वोट चोरी विरोधात व मुख्य निवडणूक आयोगाचे अध्यक्ष ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासह इतर मागण्यांना घेऊन आज ०१ नोव्हेंबर २०१६ रोजी रामलीला मैदान दिल्ली येथे राहुल जी गांधी यांच्या नेतृत्वात होत असलेल्या आंदोलनास पाठिंबा म्हणून बीड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, शहराध्यक्ष मोहम्मद इलियास टेलर, जिल्हा सरचिटणीस मिलिंद मस्के, माजी नगरसेवक शेख अमर, कामगार काँग्रेसचे अध्यक्ष संतोष निकाळजे, निराधार निरक्षित विभागाचे अध्यक्ष शेख मोहसीन, इंटक काँग्रेसचे अध्यक्ष रामधन जी जमाले, वडवणी तालुकाध्यक्ष शिवाजी कोठुळे, युवक काँग्रेसचे विजय पवार, शेख जहीर, फरान सय्यद, मोहम्मद खमृद्दीन, मुजीब ए वन टेलर यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित उपस्थित होते.

आ.सईद खान यांच्या मागणीला यश

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना मोठा दिलासा

पाथरी/आवडाजी ढवळे

राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करत महाराष्ट्र शासनाने प्रमाणपत्र देण्यावरील स्थगिती उठवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना मोठा दिलासा मिळणार असून, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील स्थगिती उठवावी,अशी मागणी आमदार सईद खान यांनी अमरावती शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकी वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती.या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने राज्य शासनाने थेट शासन निर्णय (जीआर) जारी करून प्रमाणपत्र देण्यावरील स्थगिती उठवली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाने २९ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र देण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागातील अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

यापूर्वी प्रशासकीय कारणास्तव अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे अनेक संस्थांची प्रमाणपत्रासंदर्भातील प्रकरणे प्रलंबित होती. आता ही स्थगिती उठवण्यात आल्याने संबंधित संस्थांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू होण्यास मदत होणार आहे.

शासन निर्णयात प्रमाणपत्र वितरणाच्या कार्यपद्धतीत सुसूत्रता आणि पारदर्शकता आणणे, प्रलंबित प्रकरणांचा कालमर्यादेत निपटारा करणे तसेच प्रमाणपत्रांच्या पडताळणीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात आला आहे.

आमदार सईद खान यांनी अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या प्रश्नाकडे (पान २ वर)

अंबाजोगाईतील अतिक्रमण हटाव मोहीम कायदेशीर तरतुदींनुसारच; सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्पष्टीकरण

नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये; शहराच्या विकासासाठी सहकार्य करण्याचे आवाहन

अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात दि. ३० व ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेली अतिक्रमण हटाव मोहीम कायदेशीर तरतुदी व नियमांनुसारच करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. या कारवाईबाबत समाजमाध्यमांवर चुकीच्या अफवा पसरवू नयेत तसेच नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण करू नयेत, असे आवाहन विभागाच्या वतीने कार्यकारी अभियंता गो प्र स्वामी यांनी केले आहे.



अंबाजोगाई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय जाणारा रोड, शासकीय विश्राम गृह ते सदरबाजार आणि अण्णाभाऊ साठे चौक ते मांडवा रोड वरती दि. ३० व ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली असून ही मोहीम

कायदेशीर तरतुदी व नियमांनुसारच करण्यात आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता (गो. प्र. स्वामी) यांनी दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात अतिक्रमण हटाव मोहिमेबाबत सविस्तर भूमिका मांडली आहे.

महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५, महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता २०२० तसेच नगर विकास विभागाच्या दि. ५ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, अन्य शहरांतील राज्य रस्त्यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच नगर परिषद बांधकाम परवान्यांच्या नियम व अटींच्या अधीन राहून, कायदेशीर तरतुदींनुसार अतिक्रमणे (पान २ वर)

शिवसेना (उबाठा) जिल्हा प्रमुख रविंद्र धर्मे यांच्या इशाऱ्यानंतर लोणी बु. चा पाणी पुरवठा अखेर सुरू

पाथरी/आवडाजी ढवळे

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे परभणी जिल्हाप्रमुख रवींद्र रामकिशन धर्मे यांनी दिलेल्या आमरण उपोषणाच्या इशाऱ्याला अखेर यश आले आहे. त्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर मौजे लोणी बु. ता. पाथरी येथील रखडलेला पाणी पुरवठा काल शनिवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या लोणी बु. व अंतर्गत येणाऱ्या चार तांड्यांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सविस्तर वृत्त आसे कि शिवसेना (उबाठा) परभणी जिल्हा प्रमुख रवींद्र धर्मे व माजी जि.प. सदस्य रणजित जिजाभाऊ गिराम यांनी दि.१४/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परभणीच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले होते. जलजीवन मिशन अंतर्गत गेल्या तीन वर्षांपासून पाणीपुरवठा योजनेचे काम रखडले असून, सध्या दुष्काळी परिस्थितीत गावातील सर्व पाण्याचे स्रोत कोरडे पडले आहेत. तरुगव्हाण बंधाऱ्यातील विहिरीत मुबलक पाणी उपलब्ध असतानाही केवळ ठेकेदाराच्या उदासीनतेमुळे



व निष्क्रियतेमुळे पिण्याचे पाणी मिळत नसल्याने, आठ दिवसांत काम पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा दि. १ नोव्हेंबर २०२६ पासून कार्यालयासमोर आमरण उपोषण करू, असा इशारा त्यांनी दिला होता. या बातमीस अनेक माध्यमांनी ने प्रसिद्धी दिली होती.

या इशाऱ्याची तातडीने दखल घेत प्राधिकरणाने संबंधित ठेकेदारास आदेश देऊन युद्धपातळीवर काम पूर्ण करून घेतले आणि कालपासून पाणीपुरवठा सुरू केला.

पाणीपुरवठा सुरू झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, या प्रश्नावर आवाज (पान २ वर)



महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मनमानी कारभाराविरुद्ध एल्गार: पंचक्की मुख्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू!

हिशोब द्या, नाहीतर खुर्च्या रिकाम्या करा; आर्थिक गैरव्यवहार, बैठकांचे इतिवृत्त आणि बेकायदेशीर सहभागाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची जोरदार मागणी..

छत्रपती संभाजीनगर/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील संशयास्पद कारभार, आर्थिक उधळपट्टी आणि प्रशासकीय अनागोंदीविरोधात अखेर जनआक्रोशाचा भडका उडाला आहे. वारंवार निवेदने, तक्रारी आणि पाठपुरावा करूनही ढिम्म प्रशासन हलत नसल्याने संतप्त झालेले कार्यकर्ते मोहम्मद खमरुल इमान खान जफर खान नाज यांनी आज, २ नोव्हेंबर रोजी पंचक्की येथील वक्फ मंडळाच्या मुख्य मुख्यालयासमोर थेट बेमुदत आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. ''केवळ पोकळ आश्वासने चालणार नाहीत; ठोस लेखी कारवाई आणि सर्व हिशोब जनतेसमोर मांडल्याशिवाय एक पाऊलही मागे हटणार नाही,'' असा कडक इशारा दिल्याने वक्फ वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.सार्वजनिक आणि धार्मिक मालमत्तांचे रक्षण करणाऱ्या वक्फ मंडळात कोट्यवधींच्या निधीचा विनियोग नेमका कुठे आणि कसा होतो, हा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. उपोषणकर्त्यांनी उपस्थित केलेले रोकडे सवाल प्रशासनाच्या कारभारावर संशयाची सुई निर्माण करत आहेत. पाच वर्षांचे ऑडिट अहवाल गायब? सन २०२० ते २०२५ या काल-



ावधीतील अधिकृत लेखापरीक्षण अहवाल आणि ऑगस्ट २०२६ पर्यंतची माहिती तातडीने अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. अहवाल सार्वजनिक करण्यास मंडळ घाबरते कोणाला, असा थेट सवाल विचारला जात आहे. बंद दाराआड काय शिजले? ऑक्टोबर २०२३ ते २५ ऑगस्ट २०२६ या दरम्यान झालेल्या सर्व बैठकांचे इतिवृत्त, संमत झालेले ठराव आणि वादग्रस्त निर्णय तात्काळ जनतेसमोर उघड करावेत. बैठकींच्या नावाखाली लाखो रुपयांची उधळपट्टी? जानेवारी २०२० पासून बैठकांवर नेमका किती खर्च झाला, याचे संपूर्ण बिल आणि खर्चाचे कारण जनतेसमोर मांडण्याची मागणी लावून धरण्यात आली आहे.या उपोषणातील सर्वांत स्फोटक मुद्दा म्हणजे बैठकांमधील सदस्यांचा बेकायदेशीर सहभाग! जून २०२६ च्या बार कौन्सिल निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरही ॲड. इफ्तेखार हाश्मी यांनी २५ ऑगस्ट २०२६ पर्यंत मंडळाच्या बैठकांमध्ये कसा काय भाग घेतला? आयुब पठाण आणि ॲड. हाश्मी यांच्या सदस्यत्वाची कायदेशीर वैधता काय? २२ जून ते २५ ऑगस्ट २०२६ दरम्यान घेतलेले सर्व निर्णय, ठराव आणि (पान २ वर)

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

नोव्हेंबर / November
सोमवार / Monday
दि.०२ / Dt: 02
२०२६ / 2026
jagmitra2010@gmail.com

महाराष्ट्रातील दैनिक
जगमित्र
सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ४ पाने Pages 4
३ किंमत रूपये Price 3 rupees
www.jagmitra.com

नांदेड/Nanded • वर्ष १ /Year 1 • अंक २८२ /Issue 282 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२६/ए०२७० /RNI.No.MHMAR/26/A0270

इतर मागास बहुजन कल्याण विभागात भरला अनागोंदीचा काळाबाजार!

नांदेड । प्रतिनिधी

येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असणारे सहाय्यक संचालक यांनी नियमबाह्य कामांचा कार्यक्रम सुरू केला असून शासनपत्रांना न जुमानता अक्षरशः अनागोंदीचा आर्थिक काळाबाजार भरला असल्यामुळे ते शासनाला गद्दार झाले की काय अशी खुमासदारपणे चर्चा ऐकावयास मिळत आहे. यांची या पदासाठी पात्रता नसताना देखील त्यांनी अ दर्जाचे सहाय्यक संचालक हे पद प्रति नियुक्तीवर मिळविले आहे मंत्रालय वशिल्याने हे पद मिळविल्याची दाट शक्यता असून ते या ठिकाणी रुजू झाले तेव्हापासून आजपर्यंतच्या कार्यकाळाची सखोल चौकशी मायबाप सरकारने केल्यास त्यांना जेल वारी झाल्याशिवाय राहणार नाही, अशी देखील कानकुण लागली आहे. नांदेड येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक श्री सचिन खुणे हे ऑगस्ट २०२६ पासून या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर पद भोगत आहेत त्यांची मूळ नियुक्ती वन विभागातली आहे.

या खात्याकडून विमुक्त जाती भटक्या जमातीच्या गोरगरिबांच्या लेकरांसाठी आश्रम शाळा चालतात यातील एका आश्रम शाळा संस्था चालकाने व त्या संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी मिळून बनावट कागदपत्रे व नियुक्ती आदेश तयार करून एका सहशिक्षक पदाची मागच्या तारखेत नियुक्ती दाखवून तत्कालीन उपसंचालक लातूर यांचे कार्यालयाकडे या पदमान्यतेचा प्रस्ताव लाखो रुपये देऊन मान्य करून घेतला त्याची नियुक्ती १५.६. २०१४ अशी दाखवली आणि प्रस्ताव मात्र ३०.०६.२०१७ रोजी पाठवला नियुक्ती झालेला शिक्षक दुसर्याच शाळेवर कार्यरत होता ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यामुळे अपहार/गैरव्यवहार

सहाय्यक संचालक सचिन खुणे झाले शासनाला गद्दार!

केले प्रकरणी संबंधितावर गुन्हे दाखल झाले. परंतु त्या सहशिक्षकाची बोगस व बनावट मान्यता रद्द करून त्यांना दिनांक १५. ६.२०१४ पासून दिलेले सर्व वेतन वसूल करून त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करणे संबंधी वस्तू स्थितीदर्शक अहवाल पाठविण्यास कळविण्यात आले होते. परंतु गेली चार महिन्यापासून भ्रष्टाचारी सहाय्यक संचालक सचिन खुणे यांनी अपहार/ गैरव्यवहार प्रकरणातील आरोपीकडून लाखो रुपये घेऊन हा अहवाल आज पर्यंत वरिष्ठांना पाठविलेला नाही.

यासह माताजी शिक्षण संस्था वाघाळा सिडको नवीन नांदेड संचलित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेची मान्यता रद्द केलेली असताना व प्रकरण न्याय प्रविष्ट असताना कर्मचार्यांना पद मान्यता/ सेवार्थ प्रणालीत नावे समाविष्ट/डीसीपीएस क्रमांक देऊन नियमबाह्य वेतन सुरू करून शासनाची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी सर्व नियमबाह्य पद मान्यता रद्द करून संबंधितावर कठोर कारवाई करणे बाबत कोणत्याही प्रकारची चौकशी न करता मागील दोन महिन्यापासून अहवाल न पाठवणारा सचिन खुणे शासनाला गद्दार झाला आहे की काय? अशी चर्चा आता नांदेड जिल्ह्यात ऐकावयास मिळत आहे.

त्याचप्रमाणे ड ग्रेडमध्ये गेलेल्या आश्रम शाळा व संचालक साहेब इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आश्रम शाळांची मान्यता रद्द केलेल्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा, नवीन नांदेड या शाळेच्या बेकायदेशीर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पद भरती मान्यता न मिळणे बाबतच्या तक्रारी संदर्भात प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग लातूर यांचे दिनांक नऊ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार नियमानुसार योग्य ती कारवाही करण्याच्या आदेशाला केराची टोपली दाखवून लाखो रुपयांसाठी शासनाचे कर्तव्य न बजावता इतर मागास बहुजन कल्याण विभागात अनागोंदीच्या आर्थिक काळाबाजार करून शासनाची कोट्यावधी रुपयांची आर्थिक फसवणूक करणार्या सहाय्यक संचालक सचिन खुणे यांची आर्थिक गुन्हे शाखेकडून कसून चौकशी झाल्यास हा शासनाच्या आर्थिक लुटीचा प्रकार उघडकीस आल्याशिवाय राहणार नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्रात मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करा; छावा मराठा युवा महासंघ आक्रमक

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील बरबडा, कापशी व कलबर या तीनही प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आठवड्यातून फक्त दोन दिवस येत असून मुख्यालयी राहत नसल्याने गोरगरीब रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. याबाबत छावा मराठा युवा महासंघाचे उपजिल्हा प्रमुख विक्रम पाटील बामणीकर यांनी आज सार्वजनिक आरोग्य मंत्री.प्रकाश आबिटकर.यांची प्रत्यक्षात भेट घेऊन निवेदन दिले आहे. यावेळी उपस्थित नांदेड दक्षिण शिवसेनेचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर आ.बाबुराव पाटील कोहिळकर उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की नायगाव तालुक्यातील बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णवाहिका असून अडचण नसून कोळंबा अशी स्थिती झाली आहे कारण या रुग्णवाहिकेला चालक नसल्यामुळे ग्रामीण व खेडेगावातून येणाऱ्या गंभीर रुग्णांला खाजगी वाहनातून नांदेड येथे रुग्णालयात नेण्याची वेळ आली आहे. व लोहा तालुक्यातील कापशी येथील आरोग्य अधिकारी हे मुख्यालय ने न राहता नांदेड



वरून अपडाऊन करत आहेत त्यामुळे रात्री अपरात्री एखांदा गंभीर रुग्ण आला तर येथे उपचार मिळत नाहीत त्यामुळे तेथील रुग्णांना नांदेडची धाव घेण्याची वेळ आली आहे त्याचप्रमाणे लोहा तालुक्यातील कलबर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची तेच स्थिती असून याही ठिकाणी आरोग्य अधिकारी कर्मचारी राहत नाहीत त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा वेळेवर मिळत नाही त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी हे मुख्यालय राहत नाहीत त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला वेळेवर आरोग्य सुविधा उपलब्ध होत नाहीत त्यांना खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत आहे तर प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या प्रमाणात औषधाचाही तुटवडा दिसून येत आहे.

PHC चे डॉक्टर मंगळवार आणि शुक्रवार असे फक्त दोन दिवस हजेरी लावतात. उर्वरित पाच दिवस झक्क मध्ये फक्त कंपाउंडर आणि सिक्युरिटी गार्ड असतो. रात्री-अपरात्री प्रसूतीसाठी आलेल्या गरोदर माता, सर्पदंश आणि अपघाताच्या रुग्णांना उपचाराविना परत जावे लागते. तसेच IPHS नुसार आवश्यक ११० प्रकारची औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध नाहीत आणि बरबडा येथील १०२ ची रुग्णवाहिका ड्रायव्हर अभावी धूळ खात उभी आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेला कायमस्वरूपी दवाखान्यात राहणारा ड्रायव्हर तात्काळ उपलब्ध करून द्यावे अशा मागणीचे निवेदन प्रकाश आबिटकर आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे विक्रम पाटील बामणीकर छावा मराठा युवा महासंघ उपजिल्हाप्रमुख नांदेड यांनी एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम ४ अन्वये निलंबनाची कारवाई करावी. तिन्ही केंद्रात पूर्णवेळ डॉक्टर, औषधसाठा आणि १०२ रुग्णवाहिकेवर कायमस्वरूपी चालक नेमावा. सर्व PHC मध्ये बायोमेट्रिक हजेरी आरोग्य अधिकाऱ्याची तपासण्यात यावी व तपासापूर्वी त्यांना अडवून आल्यास तात्काळ निलंबित करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी यांना देण्यात यावे अशा विविध मागण्याचे निवेदन आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर आलेले प्रकाश आबिटकर. आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांची भेट घेऊन विक्रम पाटील बामणीकर छावा मराठा युवा महासंघ उपजिल्हाप्रमुख नांदेड यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. यावेळी छावा मराठा युवा महासंघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

दुष्काळात पशुधन वाचविण्यासाठी चारा-पाण्याचे नियोजन करा; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे शेतकरी-पशुपालकांना आवाहन

कारेगाव येथे शेतकरी व पशुपालकांशी संवाद

नांदेड । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा व पाण्याचे योग्य नियोजन करून उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करावा. पशुधनाचे आरोग्य व उत्पादनक्षमता टिकविण्यासाठी शास्त्रीय चारा व्यवस्थापनावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. लोहा तालुक्यातील कारेगाव येथे शनिवारी, दि. ३१ ऑक्टोबर रोजी प्रगतशील शेतकरी सुधाकर किरवले पाटील यांच्या प्रक्षेत्रावर चारा साक्षरता अभियानांतर्गत शेतकरी व पशुपालकांसाठी मार्गदर्शन व संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



यावेळी हिरवा व वाळलेला चारा, सोयाबीन कुटार, पिकांचे अवशेष यांचा योग्य वापर, मुरघास निर्मिती, चारा साठवणूक, संतुलित पशुआहार आणि पाणी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशासन शेतकरी व पशुपालकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, भविष्यातील चारा व पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंवर्धन आणि नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे सेवानिवृत्त विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांनी पशुधनाचे आरोग्य व उत्पादनक्षमता टिकविण्यासाठी संतुलित आहार आणि चारा व्यवस्थापनाचे महत्त्व विशद केले. प्रादेशिक सहआयुक्त डॉ. राजकुमार पडिले व जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना व उपाययोजनांची माहिती दिली.

यावेळी जिल्हाधिकारी व मान्यवरांनी सुधाकर किरवले पाटील यांच्या प्रक्षेत्रावरील पशुधन, चारा साठा आणि मुरघासाची पाहणी केली. कार्यक्रमास कंधारचे उपविभागीय अधिकारी विलास नरुटे, लोहा नगराध्यक्ष शरद पवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णीचे डॉ. महेश अंभोरे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व पशुपालक उपस्थित होते.

नागपूर-तुळजापूर महामार्गावरील नांदगव्हाण घाटात खासगी बसला अपघात

उमरखेड । प्रतिनिधी

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील नांदगव्हाण घाटात रविवारी (दि. १) पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास रायपूरहून सोलापूरकडे जाणाऱ्या खासगी एसी स्लीपर कोच बसचा अपघात झाला. या बसमध्ये सुमारे ३३ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत दोन प्रवासी जखमी झाल्याचे समजते. सुदैवाने, मोठी जीवितहानी टळली. पहाटेच्या सुमारास प्रवासी झोपेत असतानाच घाटातील एका वळणावर बसचा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच मदतकार्य सुरू करण्यासाठी हालचाली करण्यात आल्या. जखमी प्रवाशांना उपचारासाठी हलविण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, जखमींची नेमकी संख्या, त्यांची प्रकृती तसेच अपघाताचे निश्चित कारण याबाबत अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही.

नांदगव्हाण घाट हा नागपूर-तुळजापूर महामार्गावरील महत्त्वाचा आणि वर्दळीचा टप्पा आहे. या मार्गावरून खासगी प्रवासी बस, अवजड वाहने, मालवाहू ट्रक तसेच अन्य वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. त्यामुळे घाटातील तीव्र वळणे आणि उतार असलेल्या ठिकाणी वाहनचालकांनी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. लांब पल्ल्याच्या बसचालकांनी पुरेशी विश्रांती घेतली आहे का, वाहनाचा वेग नियंत्रित आहे का आणि रात्री, पहाटेच्या प्रवासादरम्यान आवश्यक सुरक्षा नियमांचे पालन केले जाते का, याकडे संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचबरोबर, घाटातील धोकादायक वळणांवर पुरेशी प्रकाशव्यवस्था, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर, संरक्षक कठडे आणि इतर आवश्यक सुरक्षा उपाय उपलब्ध आहेत का, याची पाहणी करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

बुद्धांचा धम्म आपल्याला संपत्तीचा नव्हे, तर सद्गुणांचा वारसदार बनण्यास सांगतो : भंते पय्यांश

भोकर । प्रतिनिधी

बुद्धांचा धम्म आपल्याला संपत्तीचा नव्हे, तर सद्गुणांचा वारसदार बनण्याची शिकवण देतो. आपल्या आचरणातून बुद्धांचे विचार प्रतिबिंबित झाले पाहिजेत. पंचशीलाचे पालन, शुद्ध आचरण आणि मानवतेची भावना हीच धम्माची खरी ओळख आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या व्यस्त जीवनातून बुद्ध धम्माच्या चिंतनासाठी थोडासा वेळ देऊन धम्मविचार आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन पूर्णा येथील भंते पय्यांश यांनी केले.

भोकर येथील पंचशील बुद्ध विहारात आषाढ पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत सलग तीन महिने 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाचे



सामूहिक पठण, वाचन व चिंतन करण्यात आले. या उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर रोजी भंते पय्यांश यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बौद्ध महासभेचे अध्यक्ष एस.आर. जोंधळे होते. प्रमुख अतिथी म्हणून यू.एन. येडके, बी.एस. सरोदे, सुधांशु कांबळे आणि विक्रम क्षीरसागर उपस्थित होते. यावेळी सलग तीन महिने 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाचे वाचन व विश्लेषण करणारे डी.एस. गायकवाड व रमेश गायकवाड यांचा उपस्थितांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी धम्मप्रवचन करताना भंते पय्यांश यांनी बुद्धांच्या धम्मातील पंचशील, करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि शील या मूल्यांचे महत्त्व विशद केले. बुद्ध धम्म हा केवळ पूजा, पठण अथवा विचार ऐकण्यापुरता मर्यादित नसून तो माणसाला शील, सदाचार, करुणा, मैत्री आणि प्रज्ञेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो, असे त्यांनी सांगितले. 'बुद्ध धम्माशिवाय दुसरा पर्याय नाही' असे केवळ म्हणण्यापेक्षा बुद्धांच्या धम्माला आपल्या जीवनात थोडासा वेळ देण्याचा प्रयत्न करा, असे आवाहनही भंते पय्यांश यांनी केले.

बुद्धांचे विचार केवळ ऐकून न राहता ते दैनंदिन जीवनात आचरणात आणणे, हाच खऱ्या अर्थाने धम्माचा मार्ग आहे. धम्माचे पठण, चिंतन आणि आचरणातून व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे डी वाघमारे यांनी केले, तर आभार सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमास बौद्ध उपासक-उपासिका तसेच धम्मप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सावळीच्या शिरपेचात मानाचा तुरा; शेख बिलाल महेमूद यांची असिस्टंट ब्रँच पोस्टमास्टरपदी निवड

कुंडलवाडी । प्रतिनिधी



बिलोली तालुक्यातील सावळी गावातील शेख बिलाल महेमूद यांनी आपल्या यशाने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांची भारतीय टपाल विभागात असिस्टंट ब्रँच पोस्टमास्टर या पदावर नुकतीच निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे सावळी गावासह बिलोलीत आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेख बिलाल हे सावळी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा महेक जनरल स्टोअर्स, बिलोलीचे मालक शेख महेमूद सावळीकर यांचे सुपुत्र आहेत. वडिलांकडून मिळालेले संस्कार, जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे.

त्यांच्या निवडीची बातमी समजताच शेख कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच सावळी आणि बिलोली शहर परिसरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांचे कौतुक करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातील तरुणांनीही जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश संपादन करू शकते, याचे शेख बिलाल यांनी उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या या यशामुळे गावातील तरुणाईला निश्चितच नवी प्रेरणा मिळणार आहे. भारतीय टपाल विभागातील आपल्या नव्या जबाबदारीत त्यांनी प्रामाणिकपणे आणि उत्कृष्ट सेवा बजावत यशाची नवनवी शिखरे गाठावीत, अशी अपेक्षा आणि सदिच्छा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहेत.

दिव्यांग सेवानिवृत्त पीएसआय सूर्यभान कागाने यांचे नळपाणी आणि सिमेंटच्या रस्त्यासाठी आयुक्तांना निवेदन

अपार्टमेंट 'ई' मधील नळातून पाणी येत नसल्याची तक्रार; परिसरात तात्काळ सिमेंट रस्त्याचे काम करण्याची मागणी

उस्माननगर । प्रतिनिधी

सूर्यभान दिगंबर कागणे (५९), दोन्ही पायनालंदा इंग्लिश मीडियम हायस्कूल जिल्ह्यातील १००% दिव्यांग आणि सेवानिवृत्त पीएसआय असलेले ते, नालंदा इंग्लिश मीडियम हायस्कूलच्या मोंढा परिसराजवळील सिडको, सोमेश्वर नगर, राज अपार्टमेंट ई, फ्लॅट क्रमांक २०१ येथे राहतात. त्यांनी नांदेड-बागळा महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांना एक निवेदन सादर केले आहे, ज्यात म्हटले आहे की नियमित घर कर आणि पाणी कर भरूनही राज अपार्टमेंट ई मध्ये अद्याप नळाचे पाणी आलेले नाही.



अपुऱ्या पावसामुळे बोअरवेलमधील पाणी आटले असून, त्यामुळे पिण्याच्या पाण्याची चिंता वाढली आहे. कागणे यांनी स्पष्ट केले की, त्यांचे दोन्ही पाय अपंग आहेत आणि त्यांच्या पत्नीला गुडघ्याचा त्रास आहे, त्यामुळे त्यांना बाहेरून पाणी आणणे कठीण जाते. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवाहन केले आहे की, परिसरात तात्काळ नळजोडणी आणि नियमित पाणीपुरवठा सुरू करावा आणि सिमेंट रस्त्याचे काम सुरू करावे. त्यांनी निवेदन सादर केले असून, सामाजिक आणि छापील माध्यमांतील वृत्तानुसार, या संदर्भात नऊपेक्षा जास्त अर्ज या पूर्वी सादर करण्यात आले आहेत. तरी संबंधित विभागाकडून कोणतीच हालचाल केली नसल्याने मनपाच्या कार्यपद्धती वर असंतोष व्यक्त केला आहे.

'एक देश, एक निवडणूक' विषयावर युवकांची अभ्यासपूर्ण मते; विकसित भारत युवा संसद उत्साहात

माय भारततर्फे जिल्हास्तरीय युवा संसदेचे आयोजन; ५० हून अधिक युवक-युवतींचा सहभाग

नांदेड । प्रतिनिधी

युवकांमध्ये नेतृत्वगुण, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवरील चिकित्सक विचारशक्ती विकसित करण्याच्या उद्देशाने माय भारत, नांदेड यांच्या वतीने यशवंत महाविद्यालयात जिल्हास्तरीय 'विकसित भारत युवा संसद २०२६-२७' उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील ५० हून अधिक युवक-युवतींनी सहभाग नोंदवत 'एक देश, एक निवडणूक' या विषयावर आपली मते प्रभावीपणे मांडली. कार्यक्रमाचे उद्घाटन यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे यांच्या हस्ते झाले. युवकांनी राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांचा सखोल अभ्यास करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या स्पर्धेत सहभागी युवकांनी 'एक देश, एक निवडणूक' संकल्पनेचे फायदे, आव्हाने तसेच भारतीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थेवरील संभाव्य परिणाम



यांवर अभ्यासपूर्ण मते मांडली. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. शिवाजी सूर्यवंशी, विष्णू गोदबोले, सारिका बकवाड पाटील, प्रा. रितीशा नालवडे आणि नागसेन तुळसे यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत कु. मेहक पठाण यांनी प्रथम, अभिजित कोलते यांनी द्वितीय, तर कु. अनीशा डोडके यांनी तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी माय भारतच्या जिल्हा युवा अधिकारी कु. अशनी अनिल कानकटे यांनी युवकांनी संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, चिकित्सक विचारशक्ती आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करून उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. युवा संसदेसारखे उपक्रम युवकांमध्ये आत्मविश्वास, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. सायननाथ बिंदगे, इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. रत्नमाला म्हस्के यांच्यासह प्राध्यापक, परीक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी जिल्हा युवा अधिकारी कु. अशनी कानकटे यांनी आभार मानले. 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' या केंद्र शासनाच्या उपक्रमाचा भाग असलेल्या युवा संसदेच्या माध्यमातून युवकांना विकसित भारत २०४७ या संकल्पनेशी जोडणे, राष्ट्रीय विषयांवर विचारमंथन घडविणे आणि देशाच्या विकासप्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.०२ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

'लोकशाही बचाव, अराजकता हटाव' अभियानांतर्गत नांदेडमध्ये भव्य रॅली; देगलूर भाजप मंडळाचा उत्स्फूर्त सहभाग

देगलूर । अजीम अन्सारी

'लोकशाही बचाव, अराजकता हटाव' या अभियानांतर्गत नांदेड येथे आयोजित करण्यात आलेली भव्य रॅली आणि जाहीर सभा अत्यंत उत्साहात पार पडली. या सभेला भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या भव्य रॅली व जाहीर सभेमध्ये देगलूर शहर भाजप मंडळाने अत्यंत सक्रिय आणि दमदार सहभाग नोंदवला.

देगलूरहून आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने रॅलीमध्ये मोठा उत्साह पाहायला



मिळाला. लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे, अराजकतेला रोखणे आणि जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी कार्य करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. रॅलीदरम्यान उपस्थितांनी दिलेल्या घोषणांमुळे आणि एकजुटीच्या बुलंद आवाजामुळे परिसर दुमदुमून गेला होता. या अभियानात देगलूर भाजपकडून खालील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशांत दासरवार (मंडळ अध्यक्ष, देगलूर शहर भाजप), दीपक संगमकर (शहर सरचिटणीस, देगलूर भाजप), संग्राम मामा देगावकर, सचिन कांबळे (सोशल मीडिया संयोजक, देगलूर भाजप), अजीम अन्सारी (अध्यक्ष, भाजप अल्पसंख्याक मोर्चा, देगलूर शहर), (तसेच देगलूर भाजपचे इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्य सेवेपासून एक ही नागरीक वंचित राहणार नाही याची काळजी सरकार घेत आहे : ना. अबिटकर

हिमायतनगर । धम्मपाल मुनेश्वर

राज्यात आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. प्रत्येक नागरीकांच्या आरोग्याची काळजी सरकार म्हणून आम्ही घेत असताना, नागरीकांनीही त्यांच्या आरोग्याच्या समस्येंबाबत जागरूकपणे शासकीय रूग्णालयात उपचार घ्यावेत. राज्य सरकार प्रत्येक नागरीकांच्या आरोग्याची काळजी सरकार म्हणून घेत असून, आता आरोग्यसेवा संवाद यात्रेच्या माध्यमातून आरोग्यसेवेला अधिक बळकटी देण्याचे काम सरकार करणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे आरोग्यमंत्री ना. प्रकाश अबिटकर यांनी केले.

रविवार दि १ आरोग्यमंत्री ना. अबिटकर हिमायतनगर दौर्यावर होते. सकाळी साडेआठ वाजता हिमायतनगर तालूक्यातील दरेगांवतांडा येथे ना. अबीटकर दाखल झाले. दरेगावतांडा येथे ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. नागरीकांनी आरोग्यसेवेबाबत अनेक प्रश्न मंत्री महोदयापुढे मांडले. सर्व प्रश्नांबाबत ऐकून घेवून त्या सर्व समस्या सोडविण्याचे आश्वासन ना. अबीटकर यांनी दिले. शिवसेनेच्या वतीने दिवाळी सणांसाठी आनंदाचा शिधा ना. अबीटकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आला. तालूक्यात पावसाअभावी



झालेल्या नुकसानीची पाहणी ही मंत्री महोदयानी केली. त्यानंतर वाळकेवाडी येथे आरोग्यमंत्र्यांनी भेट दिली. परवाच वाळकेवाडी येथील मजूर राजू ढाले या युवकांने बेरोजगारी, कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केली. त्या आत्महत्या केलेल्या युवकाच्या घरी जावून मंत्री महोदयानी त्यांच्या कुटूंबीयांचे सात्वंन केले. शिवसेनेच्या वतीने मयताचे कुटूंबीयास मदत ही देण्यात आली. वाळकेवाडी येथील बिरसामुंडा यांच्या पुतळयाच्या शुशोभीकरणांसाठी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी दिलेल्या २० लक्ष रूपयाच्या विकास कामाचे उद्घाटन मंत्री महोदयाच्या हस्ते करण्यात आले. ग्रामस्थांशी संवाद साधतांना ना. अबीटकर म्हणाले की, शेतकरी, शेतमजूरानी दुष्काळाचा मुकाबला नेटाने करावा. कोणीही खचून जावून टोकाचे पाऊल उचलू नये. सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शिवसेनेचे तोरण मदतीचे धोरण ही संकल्पना उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथराव शिंदे हे राज्यात राबवित आहेत. शिवसेना ताकदीने दुष्काळग्रस्त शेतकर्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभी आहे. कोणीही खचून जावून टोकाचे पाऊल उचलू नये. दुष्काळाचा मुकाबला आपण सर्वानी संयम, संघर्षीत पणाने करावा. असे त्यांनी सांगीतले. दरम्यान् दुधड येथील ग्रामीण रूग्णालयाची पाहणी त्यांनी केली. ग्रामस्थांच्या मागणीनूसार येत्या पंधरा दिवसात येथे डॉक्टर व नर्स पुरेसा स्टॉफ कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सरसम बु. येथील प्राथमीक आरोग्य केंद्राला आरोग्यमंत्र्यानी भेट देवून पाहणी करूण तेथील समस्या जाणून घेवून त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. व तसेच ग्रामीण रूग्णालय हिमायतनगर येथे भेट देवून रूग्णालयाची पाहणी केली. नागरीकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची नोंद घेवून समस्या सोडविण्याचे आश्वासन मंत्री प्रकाश अबीटकर यांनी दिले.

यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यासह आरोग्य विभाग व सर्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणांत उपस्थिती होती.

सगरोळीत वीजवाहिनीच्या दुरुस्तीचे काम करताना तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

सगरोळी येथे वीजवाहिनीच्या दुरुस्तीचे काम करताना विजेचा धक्का लागून २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला : माधव गंगाधर चावरे

बिलोली । प्रतिनिधी

तालुक्यातील सगरोळी येथे वीजवाहिनीच्या दुरुस्तीचे काम करताना विजेचा धक्का लागून २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. माधव गंगाधर चावरे असे मृत तरुणाचे नाव आहे. या दुर्घटनेप्रकरणी महावितरणच्या संबंधित कर्मचाऱ्यांसह कनिष्ठ अभियंत्याविरुद्ध बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजेचा धक्का बसल्याने मृत्यू

मृत तरुणाची आई नंदाबाई गंगाधर चावरे (वय ६०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, माधव हा मागील दोन वर्षांपासून गावातील वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबत लाईनमनचे काम करीत होता. शनिवारी सकाळी सगरोळी येथील शारदानगर परिसरात वीजवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. यावेळी माधव वीजखांबावर काम करीत असताना अचानक विजेचा धक्का बसला. तो खाली कोसळला. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

संबंधितांनी हलगर्जीपणा केल्याचा तक्रारदारांचा आरोप

वीज दुरुस्तीचे काम सुरू असताना वीजपुरवठा बंद करण्यात आला नव्हता, तसेच कामासाठी आवश्यक सुरक्षा किट व संरक्षणात्मक साधने उपलब्ध करून देण्यात आली नव्हती, असा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे.

चौघां जणांवर गुन्हा दाखल

या प्रकरणी शिवाजी गोविंदराव मामीलवाड, शिल्पा वाघमारे, शंकर गंगाधर सुरकुटलावार आणि कनिष्ठ अभियंता आकाश चंद्रवंशी यांची नावे तक्रारीत नमूद आहेत. याप्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०६(१), २८९ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक सुरजकुमार तिडके तपास करत आहेत.

दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी

संबंधित कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच आपल्या मुलाचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान, वीज दुरुस्तीच्या कामात सुरक्षा नियमांचे पालन झाले होते की नाही आणि या दुर्घटनेला नेमके कोण जबाबदार आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेमुळे सगरोळी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पाणी फिल्टर युनियनकडून थंड पाण्याच्या दरात वाढ; जार व बॉटलसाठी आता २० रुपये

कळमनुरी । गंगासागर पंडित

आखाडा बाळापूर सह रुद्रवाडी, काडली, शेवाळा, कृष्णापूर आणि पिंपरी परिसरातील पाणी फिल्टर युनियनच्या वतीने १ नोव्हेंबर पासून पाण्याच्या दरात वाढ करण्यात आली आहे. यासंदर्भात युनियनच्या वतीने दरवाढीचे फलक लावून ग्राहकांना नवीन दरांची माहिती देण्यात आली आहे. नवीन दरानुसार थंड पाण्याचा जार २० रुपये, बॉटल थंड पाणी २० रुपये, मीडियम पाणी २० रुपये, तसेच थंड मीडियम पाण्यासाठीही २०



रुपये दर निश्चित करण्यात आला आहे.

पाणी फिल्टर व्यवसायाशी संबंधित विक्रेते व व्यावसायिकांनी एकत्र येऊन आ बाळापूर पाणी फिल्टर युनियनची स्थापना केली आहे. या युनियनच्या माध्यमातून पाणी विक्रीचे दर निश्चित करण्यात आले असून सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. युनियनच्या अध्यक्षपदी गजानन बोंढारे पाटील, उपाध्यक्षपदी गजानन देशमुख, सहसचिवपदी झहीर राज, कोषाध्यक्षपदी बालाजी चाफले तर सचिवपदी शेख समीर यांची निवड करण्यात आली आहेत. नवीन दर १ नोव्हेंबर पासून लागू करण्यात आले असून ग्राहकांनी याची नोंद घ्यावी आणि युनियनला सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष गजानन बोंढारे पाटील यांनी केले आहे.

ग्रामीण रुग्णालय अर्धापूर येथे सहा बालकांवर टंग टाय शस्त्रक्रिया

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

अर्धापूर । संजय पंडित

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालय अर्धापूर येथे दि. १ नोव्हेंबर २०२६ वार रविवार रोजी टंग टाय शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ईएनटी तज्ज्ञ डॉ. पल्लेवाड यांच्या हस्ते सहा बालकांवर यशस्वीरीत्या टंग टाय शस्त्रक्रिया करण्यात आली. लहान बालकांमधील जिभेखालील पडदा लहान किंवा घट्ट असल्यामुळे बोलणे, दूध पिणे तसेच जिभेच्या हालचालींमध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात. अशा बालकांना योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत, या उद्देशाने



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून या शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. महेश पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनुपमा शिंदे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील दासरे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. विद्या झिने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

यावेळी आरबीएसके कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच डॉ. टाक, डॉ. लंगडे, डॉ. जावंत्रे, डॉ. अंतापूरकर, सय्यद, सुगावे, इंगोले, भिसे, अल्सटवार, कोकाटे सिस्टर, जोंधळे मॅडम यांच्यासह इतर कर्मचारी आणि बालकांचे पालक उपस्थित होते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बालकांना आवश्यक आरोग्य सेवा व शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध होत असल्याने पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

चिमुकल्या अनुष्काने रेखाटले जिल्हाधिकाऱ्यांचे हुबेहूब व्यक्तिचित्र!

वाढदिवसानिमित्त कलेतून दिली अनोखी भेट; जिल्हाधिकाऱ्यांकडूनही कौतुकाची थाप

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील पिंपरी बु. येथील कु. अनुष्का संतोष रिंगे या चिमुकल्या विद्यार्थिनीने आपल्या चित्रकलेच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांचे हुबेहूब व्यक्तिचित्र रेखाटत त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनोखी भेट दिली. साई स्कूल, वारंगा फाटा येथे इयत्ता आठवीत शिक्षण घेणाऱ्या अनुष्काने आपल्या कलागुणांचे सुंदर दर्शन घडवून उपस्थितांची मने जिंकली आहे.

वय लहान असले तरी कलेची आवड, कल्पकता आणि व्यक्त होणारा आदर किती मोठा असू शकतो, याचा प्रत्यय अनुष्काच्या या कलाकृतीतून आला. जिल्हाधिकारी साहेबांप्रती मनात असलेला आदर आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त काहीतरी वेगळे भेट देण्याची इच्छा या भावनेतून तिने स्वतःच्या हाताने त्यांचे आकर्षक व्यक्तिचित्र साकारले. अत्यंत मेहनत, बारकाई आणि कलात्मक



कौशल्यातून तयार केलेले हे पोर्ट्रेट तिने जिल्हाधिकारी साहेबांना भेट दिले. तिच्या या अनोख्या भेटीचे जिल्हाधिकारी साहेबांनीही कौतुक केले.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरते मर्यादित न राहता कला, क्रीडा, साहित्य आणि इतर सर्जनशील क्षेत्रांतही आपले कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. अनुष्काने अल्पवयातच चित्रकलेच्या माध्यमातून दाखवलेली प्रतिभा निश्चितच प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे. तिच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

अनुष्काच्या या कलाकृतीमुळे पिंपरी बु. गावासह साई स्कूल, वारंगा फाटा आणि तिच्या कुटुंबीयांचेही नाव उज्ज्वल झाले आहे. तिला भविष्यात योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास चित्रकलेच्या क्षेत्रात ती निश्चितच उल्लेखनीय यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. चिमुकल्या हातांनी रेखाटलेले हे व्यक्तिचित्र केवळ एक चित्र नसून त्यामागे दडलेला आदर, प्रेम आणि कलात्मक भावनेचा सुंदर आविष्कार आहे. कु. अनुष्का संतोष रिंगे हिच्या या कलागुणांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून तिच्या पुढील शैक्षणिक व कलात्मक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

कत्तलीसाठी नेले जाणारे दोन बैल पूर्णा पोलिसांच्या ताब्यात; वाहनासह ४ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त!

विजयनगर रेल्वे पुलाजवळ मध्यरात्री पोलिसांची कारवाई; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

पूर्णा । निशात शेख

कत्तलीच्या उद्देशाने वाहनातून निर्दयतेने वाहतूक केली जात असल्याचा संशय असलेले दोन बैल पूर्णा पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. शनिवारी (दि. ३१ ऑक्टोबर) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास पूर्णा शहरातील विजयनगर रेल्वे पुलाजवळ ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत अशोक लेलँड कंपनीचे दोस्त एलएस वाहन, दोन बैल आणि एक मोबाईल असा एकूण ४ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पूर्णा शहरातील विजयनगर रेल्वे पुलाजवळील रस्त्यावरून गोवंशीय बैलांची अवैधरीत्या वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षकांनी पथकाला कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार पोलीस पथकाने शनिवारी रात्री परिसरात सापळा रचून संशयित वाहन अडवले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये दोन बैल आढळून आले. हे बैल कत्तलीसाठी नेले जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला.

वाहनासह दोन बैल जप्त

कारवाईदरम्यान अशोक लेलँड कंपनीचे दोस्त एलएस वाहन (क्रमांक एमएच २२ एम २६६४) ताब्यात घेण्यात आले. वाहनातून दोन बैलांची वाहतूक केली जात होती. बैलांना दाटीवाटीने वाहनात बांधण्यात आल्याचेही निदर्शनास आले. पोलिसांनी दोन्ही बैलांची सुटका करून वाहनासह संबंधित साहित्य जप्त केले.

तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

या प्रकरणात रितेश मनोहर धोके (वय २०, रा. बलसा बु., ता. पूर्णा), रोहित बुऱ्हान कुरेशी (रा. पूर्णा) आणि मोहसीन खलील कुरेशी (रा. टाकळगव्हाण, ता. पूर्णा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहनचालकासह संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची पोलिसांकडून चौकशी करण्यात येत आहे.

४ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी केलेल्या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये अशोक लेलँड दोस्त एलएस वाहनाची किंमत ४ लाख रुपये, दोन बैलांची प्रत्येकी ३० हजार रुपये याप्रमाणे ६० हजार रुपये आणि लावा कंपनीच्या मोबाईलची किंमत ५ हजार रुपये असा एकूण ४ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल समाविष्ट आहे.

प्राणी संरक्षण कायद्यानुसार कारवाई

याप्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मधील संबंधित कलमे तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पूर्णा पोलीस करीत आहेत. गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक रोखण्यासाठी पूर्णा पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे.

कुंडलवाडीच्या नगराध्यक्षांच्या नेतृत्वात नांदेडच्या रॅलीत शहर भाजपाचा दमदार सहभाग

कुंडलवाडी । प्रतिनिधी

विरोधी पक्षाकडून देशभरात पसरविण्यात येत असलेल्या अराजकतेच्या विरोधात भारतीय जनता पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून, दि.३१ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे 'लोकशाही बचाव - अराजकता हटाव' या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. राज कॉर्नर ते आय.टी.आय.चौकापर्यंत निघालेल्या या रॅलीने नांदेड शहर दणाणून सोडले. रॅली नंतर लगेच जाहिर सभा घेण्यात आले. यावेळी निलेश राणे, खा.अशोकराव चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, आ.अमर राजूरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कुंडलवाडीतून ११ वाहनांतून दीडशे कार्यकर्ते रवाना, या रॅलीमध्ये कुंडलवाडीचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. नगराध्यक्षा सौ.प्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्या नेतृत्वाखाली ११ क्रूझर वाहनांतून जवळपास १५० पदाधिकारी



व कार्यकर्ते नांदेडच्या रॅलीत सहभागी होते. या रॅलीत भाजपचे प्रदेश सरचिटणीस निलेश राणे, माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, आ.अमर राजूरकर, आ. तुषार राठोड, आ.जितेश अंतापूरकर, आ.भिमराव केराम, प्रदेश उपाध्यक्ष संजय गोडगे, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व किशोर देशमुख भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा जि.प.सदस्य लक्ष्मण ठक्करवाड, माजी.जि.प.सदस्य माणीकराव लोहगावे, हजप्पा पिटील सुंकलोड यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित हो.तर

कुंडलवाडी येथील नगर परिषद भाजपा गटनेते रमेश ईरलावार, भाजपा मंडळ अध्यक्ष नरेश ठाकूरवार, जेष्ठ नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, नगरसेविका प्रतिनिधी संजय पाटील खूळगे, भीम पोटतकर, नरसिमलू कोटलावार, भाजपा शहर सरचिटणीस मोहम्मद अफजल, भाजपा अल्पसंख्यांक अध्यक्ष अब्दुल माजीद नांदेडकर, रमेश गड्डूवार, महेश पुप्पलवार, लखन नागुलवार यांच्यासह सर्व बूथ प्रमुख व शक्ती केंद्र प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अरुंद गल्लीबोळांतील आगीवर आता 'फायर बुलेट'चा वॉच!

परभणी महापालिकेच्या अग्निशमन दलात दोन फायर बुलेट दाखल; महापौर सय्यद इकबाल यांच्या हस्ते लोकार्पण

परभणी । प्रतिनिधी

परभणी शहरातील अरुंद गल्लीबोळांमध्ये आगीची घटना घडल्यास मोठ्या अग्निशमन वाहनांना घटनास्थळी पोहोचताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा ठिकाणी लागलेल्या आगीवर वेळीच नियंत्रण मिळविणे अग्निशमन दलासाठी आव्हानात्मक ठरते. ही अडचण दूर करण्यासाठी आता परभणी महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात दोन अत्याधुनिक फायर बुलेट वाहने दाखल झाली आहेत. या वाहनांमुळे अरुंद रस्त्यांवरील आगीच्या घटनांवर तातडीने नियंत्रण मिळविणे शक्य होणार आहे. महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी (दि. १ नोव्हेंबर) महापौर सय्यद इकबाल यांच्या हस्ते या दोन्ही वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य अग्निशामक सेवा संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ही दोन फायर बुलेट वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. शहरातील अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण उपक्रम मानला जात आहे.

परभणी शहराचा विस्तार वाढत असताना अनेक भागांत अरुंद रस्ते, दाट लोकवस्ती आणि चिंचोळ्या गल्ल्यांचे प्रमाण अधिक आहे. अशा ठिकाणी आग लागल्यास मोठ्या अग्निशमन बंबांना घटनास्थळापर्यंत पोहोचणे कठीण होते. परिणामी, आग नियंत्रणात आणण्यासाठी विलंब होण्याची शक्यता असते. मात्र, फायर बुलेट आकाराने लहान असल्याने कमी जागेतूनही सहज मार्ग काढत घटनास्थळी पोहोचू शकणार आहेत. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यातच आगीवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार असून, संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाही हातभार लागणार आहे. लोकार्पण सोहळ्याप्रसंगी माजी सभापती अतुल सरोदे, सहायक आयुक्त शेजुळ, अग्निशमन विभागप्रमुख दीपक कानोडे, समाजकल्याण अधिकारी राजकुमार जाधव, उमेश जाधव, रमेश चव्हाण यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी महापौर सय्यद इकबाल आणि माजी सभापती अतुल सरोदे यांनी स्वतः फायर बुलेट चालवून वाहनांची पाहणी केली. नवीन वाहनांच्या समावेशामुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या आपत्कालीन सेवेला अधिक गती मिळणार असून, शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कोरडा दुष्काळ मुख्यमंत्री निधी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याकडे नगरसेविका सौ सुर्वणाताई बसवदे यांनी दिला ५१ हजारांचा धनादेश

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या भाजपाच्या प्रभाग क्रमांक २० मधील नगरसेविका सौ सुर्वणाताई सतिश बसवदे यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थिती पाहता मुख्यमंत्री सहाय्यता निधीस माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्याकडे ५१ हजारांच्या निधी सुपूर्द केला. सिडको भागातील भाजपाच्या नगरसेविका प्रतिनिधी सतिश बसवदे हे



दरवर्षी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सिडको परिसरात सामाजिक बांधिलकी जोपासत युवा गुप्र मित्र मंडळ यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून नवरत्न पुरस्कार, महिला मंडळाच्या माध्यमातून होम मिनिस्टर कार्यक्रम, हभप इंदुरीकर महाराज यांच्या किर्तन प्रवचन कार्यक्रमासह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

यावेळी महाराष्ट्र राज्यात पावसा अभावी शेतकरी हवालदिल झाल्याने कोरडा दुष्काळ पडल्याने २८ ऑक्टोबर रोजी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने होणारे कार्यक्रम रद्द करून भाजपा नगरसेविका सौ सुर्वणाताई सतिश बसवदे यांनी मुख्यमंत्री निधीस ५१ हजारांच्या धनादेश सुपूर्द केला. यावेळी नांदेड शहर भाजपा महानगर अध्यक्ष आमदार अमर राजूरकर, माजी नगरसेवक संजय झेंवाड यांच्यी उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.०२ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

पाण्याच्या टँकरखाली सापडून फिजिओथेरपीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू, काळेवाडी फाट्याजवळ दुचाकी घसरल्याने अपघात

पिंपरी । प्रतिनिधी

दुचाकी घसरून रस्त्यावर पडलेली तरुणी पाण्याच्या टँकरच्या चाकाखाली सापडली. यात गंभीर जखमी झाल्याने तिचा मृत्यू झाला. हा भीषण अपघात शनिवारी (दि. ३१ ऑक्टोबर) सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास रहाटणी फाटा ते काळेवाडी फाटा दरम्यानच्या रस्त्यावर बसथांब्यासमोर घडला.

सेजल प्रफुल लुटे (वय २१, रा. वर्धा) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. ती फिजिओथेरपीचे शिक्षण घेत होती. अथर्व लवटे (मूळ रा. खारघर, नवी मुंबई, सध्या रा. पुनावळे) असे तिच्यासोबत असलेल्या तरुणाचे नाव आहे. तोदेखील शिक्षण घेत आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सेजल ही तिच्या ओळखीच्या अथर्वसोबत दुचाकीवरून पिंपरी येथून वाकडकडे जात होती. रहाटणी फाटा ते काळेवाडी फाटा दरम्यानच्या बसथांब्यासमोर त्यांची दुचाकी अचानक घसरली. त्यामुळे दोघेही रस्त्यावर पडले. सेजल उजव्या बाजूला पडल्याने त्याचवेळी बाजूने जाणाऱ्या पाण्याच्या टँकरच्या मागील डाव्या चाकाखाली ती सापडली. टँकरचे चाक तिच्या पोटावरून गेल्याने ती गंभीर जखमी झाली. याबाबत माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी सेजलला सांगवी येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवडमध्ये ४१ हॉकर्स झोन कागदावरच; चार वर्षांत केवळ १,५०६ विक्रेत्यांना प्रमाणपत्र!

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील विक्रेते व फेरीवाल्यांसाठी वेगवेगळ्या भागात एकूण ४१ हॉकर्स झोन प्रस्तावित केले होते. मात्र, त्यापैकी एकही हॉकर्स झोन विकसित करण्यास महापालिका प्रशासनाला यश मिळालेले नाही. तर, १९ हजार ७९२ नोंदणीकृत विक्रेत्यांपैकी केवळ १ हजार ५०६ जणांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे. भाजपचे नगरसेवक तुषार हिंगे यांनी महापालिका सर्वसाधारण सभेत शहरातील हॉकर्स झोनबाबत विचारलेल्या प्रश्नांना प्रशासनाने उत्तरे दिली आहेत. त्यातून ही बाब समोर आली आहे. प्रशासनाच्या या कासव गती कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे. महापालिकेने शहरात १०० टक्के नव्हे तर, केवळ ७५ टक्के भागांत हॉकर्स झोन प्रस्तावित केले आहे. एकूण ४१ हॉकर्स झोन शहर फेरीवाला समितीमार्फत निश्चित करण्यात आले होते.

मात्र, सुमारे चार वर्षे उलटूनही अद्याप एकही हॉकर्स झोन विकसित करण्यात आलेले नाही. त्यामुळे विक्रेत्यांकडून रोष व्यक्त केला जात आहे. तसेच, महापालिकेने शहरात केलेल्या सर्वेक्षणात १९ हजार ७९२ विक्रेत्यांची नोंदणी करण्यात आली. त्यातील १५ हजार ७९२ पात्र ठरले आहे. तर, आधारकार्ड, रेशनिंग कार्ड, छायाचित्र जमा न केल्याने ४ हजार ७७९ विक्रेते अपात्र करण्यात आले आहे. एकूण १५ हजार १३ पैकी केवळ १ हजार ५०६ विक्रेत्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रमाणपत्र वाटपाचे काम कासव गतीने केले जात असल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

हॉकर्स झोन निश्चित करण्याची कार्यवाही सुरू

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सर्व दहा क्षेत्रीय अधिकाऱ्यांना ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत हॉकर्स झोन निश्चित करून यादी सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांकडून नव्याने कार्यवाही सुरू आहे. क्षेत्रीय कार्यालयनिहाय यादी अंतिम झाल्यानंतर हॉकर्स झोन तयार करण्यात येतील, असे भूमि आणि जिंदगी विभागाचे उपायुक्त सीताराम बहुरे यांनी सांगितले.

शहरात २०२२ मध्ये सर्वेक्षण

शहरात मोठ्या प्रमाणात विक्रेते व फेरीवाल्यांची संख्या आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार महापालिकेच्या वतीने शहरातील पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण व त्यांची नोंदणी करण्यासाठी विक्रेते व फेरीवाल्यांचे सन २०२२ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले. आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत खासगी एजन्सीने नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्याकडून बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यात आले. मात्र, पात्र विक्रेत्यांना अद्याप अधिकृत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाहीत.

विक्रेत्यांवर कारवाई होत असल्याने आर्थिक नुकसान

महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पथविक्रेत्यांचे अधिकृत परवान्याचे काम करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, यामध्ये बोगस फेरीवाले घुसखोरीचा आरोप होताच प्रशासनाने प्रमाणपत्र वाटपाचे कामकाज अचानक थांबण्यात आले. सर्वेक्षण होऊन चार वर्ष झाल्यानंतरही शहरातील विक्रेत्यांना अद्याप अधिकृत प्रमाणपत्र मिळालेला नाही. प्रमाणपत्र नसल्याने पात्र विक्रेते व फेरीवाल्यांवर कारवाई होत असून, त्यांचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रमाणपत्र व परवाना नसल्याने विक्रेत्यांवर अतिक्रमण विभागाकडून कारवाई केली जात असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान हेत आहे.

नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीवर महापालिकेचे निर्बंध; २५ लाखांवरील कामांना स्थायी समितीची मंजुरी आवश्यक

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहरात स्थानिक, तातडीच्या व नागरी हिताच्या पायाभूत विकासकामांना गती देण्यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीच्या विनियोगाबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. निधीचा वापर करताना कामांचे महत्त्व, तातडी व नागरिकांना होणारा लाभ विचारात घ्यावा, असे निर्देश महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाकडून नगरसेवकांना देण्यात आले आहेत.

कोणतीही पूर्वपरवानगी तसेच, मान्यता न घेता काही नगरसेवक आपल्या प्रभागात काम करत आहेत. त्यामुळे वाद निर्माण होत आहे. त्यामुळे यासंदर्भात महापालिकेच्या लेखा व वित्त विभागामार्फत स्वतंत्र परिपत्रक काढण्यात आले आहेत. नगरसेवक स्वेच्छा निधीतून कामे सुचविताना एकत्रित मोठे काम, एकाच प्रभागातील विविध ठिकाणी लहान कामे किंवा बहुसदस्यीय प्रभागात एकत्रितपणे मोठे काम अशा पर्यायांचा विचार करता येणार आहे. संबंधित कामांसाठी अर्थसंकल्पात प्रत्येक नगरसेवकासाठी मंजूर असलेल्या निधीच्या मर्यादेतच खर्च करता येईल.

एकापेक्षा अधिक नगरसेवकांना एकत्रित काम करावयाचे असल्यास निधीचे एकत्रीकरण सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करता येणार आहे. नगरसेवकांनी सुचविलेल्या कामांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यापूर्वी आवश्यक प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक असेल. पंचवीस लाख रुपयांपर्यंतच्या प्रस्तावांना नियमानुसार अतिरिक्त आयुक्तांकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची तरतूद आहे. पंचवीस लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या प्रस्तावांसाठी स्थायी समितीची पूर्वमान्यता आवश्यक राहील. संबंधित विभागांनी विहित कार्यपद्धतीनुसार पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

ही कामे करता येणार

या निधीतून रस्ते, लहान पूल, पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, गटारे, समाजमंदिरे, सार्वजनिक वाचनालये, प्राथमिक शाळांमधील आवश्यक दुरुस्ती, सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा, उद्याने, मनपाच्या जागांवरील खेळणी व व्यायाम साहित्य, पादचारी सुविधा तसेच, इतर आवश्यक नागरी कामे करता येणार आहेत. सार्वजनिक शौचालये, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, स्मशानभूमीतील मूलभूत सुविधा व नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित कामे नगरसेवकांना करता येणार आहेत.

ही कामे करता येणार नाहीत

खासगी इमारतींची दुरुस्ती, अनधिकृत वस्त्यांमधील कामे, अनुदानित संस्थांची काही कामे, मोठ्या स्वरूपाची स्वतंत्र बांधकामे व स्वेच्छा निधीच्या उद्देशाशी सुसंगत नसलेली कामे या निधीतून करता येणार नाहीत. काही विशिष्ट कामांसाठी स्वतंत्र अटी व निर्बंधही नमूद करण्यात आले आहेत.

निधीच्या वापरात नियमांचे पालन करावे

नगरसेवक स्वेच्छा निधीतील कामे सुचविताना संबंधित नगरसेवकांची लेखी शिफारस, आवश्यक प्रशासकीय व वित्तीय मान्यता आणि विहित कार्यपद्धतीचे पालन करणे आवश्यक आहे. शासन निर्णय व परिपत्रकातील तरतुदींनुसार निधीचा विनियोग करून नागरी सुविधांशी संबंधित कामांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

श्री ज्ञानेश्वर विद्यालयात सरदार पटेल यांच्या जयंती व इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

आळंदी । प्रतिनिधी



आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त, तर भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव अजित वडगांवकर यांच्या हस्ते दोन्ही नेत्यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

मार्गदर्शन करताना अजित वडगांवकर यांनी सरदार पटेल यांनी ५६५ हून अधिक संस्थानांचे विलीनीकरण करून देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेचा भक्कम पाया रचल्याचे सांगितले. तसेच इंदिरा गांधी यांनी हरितक्रांती, १९७१ चा ऐतिहासिक विजय, बांगलादेश निर्मिती आणि पोखरण अणुचाचणी यांसारख्या महत्त्वपूर्ण निर्णयांतून देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिल्याचे नमूद केले.

दोन्ही महान नेत्यांचे राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा, धाडसी नेतृत्व आणि देशहितासाठीचे कार्य आजच्या युवा पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायिनी राजहंस, हेमांगी उपरे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरात सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त एकता दिन उत्साहात

एकता दौड, व्याख्यान आणि संगीतमय देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि सरदार वल्लभभाई पटेल जयंती उत्सव समिती पिंपरी चिंचवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'सरदार प्रबोधन पर्व २०२६' ला उत्साहात सुरुवात झाली. या पर्वांतर्गत एकता दौड, व्याख्यान आणि संगीतमय कार्यक्रमासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भक्ती शक्ती चौक ते निगडी उड्डाणपूल-काचघर-भेळ चौक - अशा मार्गानै एकता दौडचा समारोप भक्ती शक्ती चौक येथे झाला.



एकता दौड सुरू करण्याआधी सर्वांनी भारत माता की जय अशा घोषणा करीत देशभक्तीमय वातावरण निर्माण केलै होते तसेच सर्वांनी आम्ही, सत्यनिष्ठापूर्वक शपथ घेतो की, आम्ही राष्ट्राची एकता, अखंडता व सुरक्षा अबाधित राखण्यासाठी स्वतःला समर्पित करू आणि आमच्या देशवासियांमध्ये हा संदेश पोचविण्यासाठी देखील भरीव प्रयत्न करू. आम्ही ही शपथ आपल्या देशाची एकता टिकवून ठेवण्याच्या भावनेने घेत आहोत, जी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दूरदृष्टी व कार्यामुळे राखणे शक्य झाली आहे. तसेच आम्ही देशाची अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करण्याकरीता आमचे स्वतःचे योगदान देण्याचा सुद्धा सत्यनिष्ठापूर्वक संकल्प करीत आहोत. अशी राष्ट्रीय एकतेची शपथ घेत देशात एकता व अखंडता राखण्याचा निर्धार केला. शपथेचे वाचन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रीय एकता आणि अखंड भारताच्या निर्मितीतील योगदानाचे स्मरण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात क्रीडा,कला व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, माजी नगरसदस्य नामदेव डाके, उप आयुक्त पंकज पाटील, सह शहर अभियंता बापू गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सायंकाळी 'वर्तमान भारतासाठी सरदार पटेल यांच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावर प्रा.महिपतराव ठाकूर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेहोते, त्यामध्ये त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विचारांचे आणि त्यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे महत्त्व विशद करण्यात आले. त्यानंतर निगडी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे 'अपरिचित सरदार गाथा' हा संगीतमय कार्यक्रम पार पडला. महापौर रवि लांडगे तसेच आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त पंकज पाटील यांच्या अधिपत्याखाली क्रीडा विभागामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तळेगाव दाभाडेकरांनो, पाणी जपून वापरा! संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेचे आवाहन

तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी

येत्या काळात पाण्याची उपलब्धता कमी होऊन दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता तळेगाव दाभाडे नगर परिषदेने नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले आहे. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने आणि योग्य पद्धतीने वापर करणे आवश्यक असल्याचे नगर परिषद पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

नगर परिषद प्रशासनाने नागरिकांसाठी पाणीबचतीसंदर्भात काही महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार, प्रत्येक नागरिकाने घरातील तसेच घराबाहेरील सर्व नळांना पाण्याच्या तोट्या बसवाव्यात. नळ सुरू ठेवून पाण्याचा अपव्यय करू नये. शुद्ध पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन धुण्यासाठी तसेच रस्ते, अंगणे आणि इमारती स्वच्छ करण्यासाठी टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच घरातील पाण्याच्या टाक्या भरताना पाणी ओव्हरफ्लो होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यासाठी आवश्यकतेनुसार ऑटोमॅटिक बॉल व्हॉल्व्ह बसवावेत. परिसरात कुठेही पाण्याची गळती किंवा अपव्यय आढळल्यास नागरिकांनी तातडीने नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाला त्याची माहिती द्यावी, असेही प्रशासनाने सूचित केले आहे.



नुकताच तळेगाव दाभाडे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला पुणे-मुंबई महामार्गालगत विजय मारुती खिंड येथे गळती लागल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असल्याची बाब निदर्शनास येताच उपनगराध्यक्ष गणेश काकडे, मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, पाणीपुरवठा विभाग प्रमुख अभिषेक शिंदे यांच्या पुढाकाराने काही तासातच ही पाणी गळती थांबवण्यात आली व भविष्यात पुन्हा ही समस्या होऊ नये, याकरिता कायमस्वरूपी उपाययोजना सुरू असल्याचे अभिषेक शिंदे यांनी सांगितले.

पाणी ही मौल्यवान नैसर्गिक संपत्ती असून तिचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आज वाचवलेला पाण्याचा प्रत्येक थेंब उद्याच्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी बचतीच्या सूचनांचे काटेकोर पालन करून नगर परिषद प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गिरीश दापकेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

माण ते शिवाजीनगर मेट्रोचा मार्ग मोकळा,पण २३ पैकी ६ स्थानकांवर प्रवाशांना 'नो एन्ट्री'...!



पिंपरी । प्रतिनिधी

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेवरील २३ पैकी १७ स्थानकांवरून पहिल्या टप्प्यात प्रवाशांना मेट्रो पकडता येणार आहे. उर्वरित सहा स्थानकांचे काम अपूर्ण असल्याने तेथे सध्या प्रवाशांना चढता किंवा उतरता येणार नाही. मात्र, माण या पहिल्या स्थानकापासून जिल्हा न्यायालय या शेवटच्या स्थानकापर्यंत सलग प्रवास करता येणार आहे. सात स्थानकांवर एकच जिना उपलब्ध असेल, तर दहा स्थानकांवर दोन्ही जिने खुले राहणार आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) प्रवासी सेवेसाठी सज्ज असलेल्या स्थानकांची यादी जाहीर केली आहे.

या सात स्थानकांवर एकच जिना

प्रारंभी सात स्थानकांवर प्रवाशांना एका जिन्याद्वारे प्रवेश आणि बाहेर पडण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यात स्थानक १ (माण), २ (माण-एमआयडीसी सर्कल फेज-२), ३ (माण-बस डेपो), ५ (हिंजवडी फेज-२ सर्कल-१), ६ (पद्मभूषण चौक), २१ (कृषी महाविद्यालय), २३ (जिल्हा व सत्र न्यायालय) या स्थानकांचा समावेश आहे.

या दहा स्थानकांवर दोन्ही जिने खुले

दहा स्थानकांवर दोन्ही जिने उपलब्ध असल्याने प्रवाशांना स्थानकात ये-जा करण्यासाठी सुविधा मिळणार आहे. यात स्थानक ४ (हिंजवडी फेज-२ सर्कल-२), ७ (श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज चौक, हिंजवडी), ८ (हिंजवडी फेज-१), ९ (वाकड चौक), १० (श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे), ११ (मिटकॉन, बालेवाडी), १२ (आर. के. लक्ष्मण म्युझियम, बालेवाडी), १७ (औंध), १८ (सकाळनगर), १९ (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) या स्थानकांचा समावेश आहे.

कोणती सहा स्थानके बंद राहणार?

स्थानक क्रमांक १३, १४, १५, १६, २० आणि २२ ही सहा स्थानके पहिल्या टप्प्यात प्रवाशांसाठी खुली होणार नाहीत. यापैकी १३ आणि १४ क्रमांकाच्या स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात असून, नोव्हेंबरअखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. उर्वरित १५, १६, २० आणि २२ क्रमांकाची स्थानके आणि त्यांचे जिने जानेवारी २०२७ पर्यंत टप्प्याटप्प्याने पूर्ण करून प्रवासी सेवेत आणण्यात येणार आहेत.

केवळ ७ टीएमसीने पाणीटंचाई निर्माण होईल; १३ टीएमसी मिळण्यासाठी पुणे महापालिका मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

पुणे । प्रतिनिधी

कालवा समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शहरासाठी पाणी कोटा मिळाल्यास शहरात पाणीटंचाई निर्माण होईल. त्यामुळे पुढील सात महिन्यासाठी



पुणेकरांना १३ टीएमसी पाणी मिळण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याची माहिती स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. २९) झालेल्या कालवा समितीच्या बैठकीत पुणे महापालिकेसाठी १ जुलै ते ३० जून या कालावधीसाठी १३.५० टीएमसी पाणी कोटा निश्चित करण्यात आला. मात्र, हा कोटा १ जुलैपासून लागू असल्याचे स्पष्ट झाल्याने पुणेकरांच्या पाण्याचे गणित बिघडले आहे. आतापर्यंत ६.३५ टीएमसी पाण्याचा वापर झाला असून, उर्वरित कालावधीसाठी केवळ ७.१५ टीएमसी पाणी उपलब्ध राहणार आहे. विशेष म्हणजे, कालवा समितीच्या बैठकीत मंजूर झालेला कोटा १ नोव्हेंबरपासून लागू होईल, असे गृहीत धरले जात होते. मात्र, प्रशासकीय पातळीवर हा कोटा १ जुलैपासून असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे पुणे शहराला पुढील आठ महिने उपलब्ध होणाऱ्या पाण्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर भिमाले यांनी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पुणेकरांना पुढील सात महिन्यासाठी १३ टीएमसी पाणी मिळावे, अशी विनंती करणार असल्याचे सांगितले.

संत डॉ. रामराव महाराज यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त बापू समाधीस्थळी भक्तिसागर; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

वाशिम । बद्रीनारायण घुगे

संत डॉ. रामराव महाराज यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त २६ ऑक्टोबर रोजी बापू समाधीस्थळी विविध धार्मिक विधी आणि भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी सहा वाजता महाआरतीने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर ध्वजारोहण, दहीहंडी, विधिवत पूजन आणि आरदास हे कार्यक्रम पार पडले. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

पुण्यतिथी सोहळ्यास धर्मगुरू आ. बाबुसिंग महाराज, देविभक्त शेखर महाराज, संजय महाराज, भक्तराज महाराज, मनीष महाराज तसेच तेलंगणातील बद्या नायक यांच्यासह राज्याच्या विविध भागांतून आलेले भाविक उपस्थित होते. सकाळी सहा वाजता समाधीस्थळी महाआरती करण्यात आली. त्यानंतर मंदिर परिसरात ध्वजारोहणाचा



कार्यक्रम पार पडला. पुढे पारंपरिक पद्धतीने दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर विधिवत पूजन करून धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले. देविभक्त शेखर महाराज यांनी आरदास म्हटल्यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्रद्धा, एकता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश

संत डॉ. रामराव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित हा सोहळा केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित न राहता समाजातील एकोपा, श्रद्धा आणि सामूहिक सहभागाचे दर्शन घडवणारा ठरला. विविध भागांतून आलेल्या भाविकांनी एकत्र येत महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले. धार्मिक परंपरांचे जतन, सामूहिक प्रार्थना आणि प्रसाद वाटपाच्या माध्यमातून बंधुभावाची भावना अधोरेखित झाली. महाआरतीपासून ते आरदास आणि महाप्रसाद वितरणापर्यंत सर्व कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. संत डॉ. रामराव महाराज यांच्या सहाव्या पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने बापू समाधीस्थळी श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा संगम अनुभवायला मिळाला.